

वेताळ पंचविशी
सौ. सुनंदा गोखले



रहस्य व रोमांचाने नटलेल्या
विलक्षण आणि
अद्‌भुत कथांचा संग्रह !

# वेताळ पंचविशी

वेताळाने विक्रम राजाला सांगितलेल्या या कथा गेली कित्येक वर्षे बाल-गोपाळांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. आणि म्हणूनच भारतातील बहुतेक प्रमुख भाषांत त्यांचे अनुवाद झाले आहेत. शौर्य, धैर्य, औदार्य, साहस आणि समयसूचकता इत्यादी मानवी गुणांचे मनोज्ञ दर्शन या कथांद्वारे होते. साहजिकच मनोरंजनाबरोबरच सद्‌गुणांचे बीजही नकळत वाचकांच्या मनात रुजते. सर्व थरांतील वाचक अतिशय आवडीने या कथा वाचत आले आहेत आणि वाचणार आहेत.


लेखिका

सौ. सुनंदा गोखले



अ

अजिंक्य बुक डेपो, पुणे ३०

मूल्य : रु. २० फक्त

प्रकाशक
सौ. अंजली आनंद साने
अजिंक्य बुक डेपो
सप्तशृंगी, १५११ सदाशिव
पुणे ४११ ०३०

पहिली आवृत्ती
१ मे २००३ (महाराष्ट्र दिन)



मुखपृष्ठ
रमेश भारताल

प्रसंगचित्रे
वसंत सहस्रबुद्धे

पृष्ठरचना व सजावट
प्रकाश बाळकृष्ण ढवळे
टेन टू टेन, ३२ पानमळा
पुणे ४११०३०

मुद्रक
डेल्टा ऑफसेट, पुणे



# क्रमबोधिनी



# वेताळ पंचविशी



फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. धारापुरीत महाराज इंद्रसेन राज्य करीत होते. ते अत्यंत शूर असून त्यांना सहा पुत्र होते. त्यात विक्रमजित हा अत्यंत धूर्त व धाडसी होता. म्हणून महाराज इंद्रसेनांनी त्याला युवराज म्हणून नेमले. धारापुरीत सर्व सुखसमृद्धी नांदत होती. महाराज इंद्रसेनांच्या मृत्यूनंतर विक्रमजित सर्व प्रजेचे पुत्रवत् पालन करून राज्यकारभारही उत्तम प्रकारे करत होता. एकदा विक्रमजितच्या मनात आले, की आपला सर्व देश एकदा नजरेखालून घालावा. म्हणजे अनुभव येईल व राज्यकारभार आणखी उत्तमप्रकारे करता येईल व थोडी मौजही होईल असा विचार करून राज्यसूत्रे आपला भाऊ भर्तृहरीकडे सोपवून प्रवासाला निघाला.

इकडे काय झाले, भर्तृहरी राज्य करीत असता एके दिवशी एक अत्यंत तेजस्वी साधू त्यांच्या दरबारात आला. त्याने राजाला आशीर्वाद देऊन एक तेजस्वी फळ दिले. ते त्याला तपश्चर्येने देवीकडून मिळाले होते. राज्याच्या कल्याणासाठी त्याने ते राजाला दिले. भर्तृहरीने साधूचा आदर-सत्कार करून त्याला निरोप दिला व ते अद्‌भुत फळ आपल्या आवडत्या राणीला मोठ्या प्रेमाने दिले; पण तिने न खाता आपल्या मर्जीतील एका सरदाराला ते दिले. त्यानेही ते फळ आपल्या अत्यंत आवडत्या नर्तिकेला दिले. या नर्तिकेला भर्तृहरी राजाबद्दल आत्यंतिक आदर होता व त्याचे कल्याण व्हावे म्हणून ते अद्‌भुत फळ भर्तृहरीस आत्यंतिक आदराने अर्पण केले. आपलेच आशीर्वादाचे अद्‌भुत फळ फिरून आपल्याकडेच आलेले पाहून त्याला सखेद

आश्चर्य वाटले. त्याला कमालीचा राग आला. त्याच पावली तो आपल्या प्रिय राणीकडे गेला व फळ दाखवून "हे तू का खाल्ले नाहीस ?" म्हणून रागाने विचारले. राणी आत्यंतिक भीतीने काळीठिक्कर पडली होती. ती काहीच बोलू शकली नाही.

या प्रकारामुळे भर्तृहरी विरक्त होऊन संसाराचा व राज्याचा त्याग करून निघून गेला. देवांचा राजा इंद्राला हे समजताच राज्याच्या रक्षणासाठी त्याने आपला सेनापती पाठविला व तो गुप्तपणे राज्याचे रक्षण करू लागला. धारापुरीची ही हकीकत प्रवासात विक्रमजिताला समजताच तो तसाच आपल्या राज्याकडे परतला. वेशींवरच देवराज इंद्राच्या सेनापतीने त्याला अडवले. शब्दावरून शब्द वाढत जाऊन त्या दोघांत भीषण युद्ध झाले. विक्रम अतिशय पराक्रमी होता. त्याने शेवटी देवांच्या सेनापतीचा पराभव केला. तो विक्रमावर प्रसन्न होऊन म्हणाला, " विक्रमा, तू खरोखरच फार शूर आहेस. राज्यकारभारास लायक राजा आहेस. मी तुझ्या हिताच्या दोन गोष्टी सांगतो त्या ऐक..." – विक्रमही सेनापतीचा उपदेश नम्रतेने ऐकू लागला.

" पूर्वी या नगरीत चंद्रभान राजा राज्य करीत होता. एकदा तो आपल्या लव्याजम्यासह घोर अरण्यात शिकारीला गेला असता त्या अरण्यात एक तपस्वी उलटे टांगून घेऊन तपश्चर्या करत होता. राजाला हे दृश्य पाहून गंमत वाटली व तो गंमतीने म्हणाला, "या तपस्व्याला जो कोणी संसारात आणेल त्याला मी मोठे बक्षीस देईन." ही बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. एका गणिकेने हे आव्हान स्वीकारले. लगेच ती वनदेवीसारखा शृंगार करून अरण्यात तपस्व्याकडे आली. आपल्या मिठ्ठास वाणीने त्याला "आपण शापभ्रष्ट देवता आहोत," असे सांगून त्याला आपल्या जाळ्यात पकडले. तो योगीही फसून तिच्यावर भाळला. त्याने तप सोडले व तो तिच्या संगतीत रममाण झाला. त्या गणिकेला या योग्यापासून मुलगा झाल्यावर ती आपल्या पतीसह दरबारात हजर झाली. तेथे त्याला सर्व हकीकत



गणिकेने आपल्या मिष्ठास वाणीने "आपण शापभ्रष्ट देवता आहोत," असे सांगून तपस्व्याला आपल्या जाळ्यात पकडले.

समजताच योगी क्रोधाने तेथून चालता झाला व त्याने पुन्हा तपश्चर्येस सुरुवात केली. कालांतराने सर्व मृत्यू पावले. आता या तिघांनी म्हणजे राजा चंद्रभान, त्या तपस्व्याचा मुलगा; एक तेल्याचे घरी व तपस्वी एका कुंभाराकडे याच नगरीत जन्माला आले आहेत. तेल्याचा मुलगा पाताळाचा राजा होणार होता; पण या कुंभाराच्या मुलाने संधी साधून त्याला ठार मारले व पिशाच्च करून स्मशानात एका झाडाला उलटे टांगून ठेवले आहे. तो आता तुझा प्राण घेण्याच्या विचारात आहे. त्याचे हातून जर वाचशील तर अक्षय राज्यसुख उपभोगशील. तुझे कल्याण असो." असे म्हणून सेनापती अदृश्य झाला. राजा विक्रम आपल्या राजधानीत आल्यावर अतिशय सावध राहून राज्य करू लागला.

एके दिवशी एक योगी दरबारात आला व राजाला एक फळ देऊन निघून गेला. त्याच्या मनात संशय आला. "आपल्याला मारणारा हाच तर योगी

नसेल ना?" राजाने ते फळ एका बाजूला जपून ठेवले. त्यानंतर रोज तो योगी येई व राजाला फळ देऊन निघून जात असे.

एकदा योग्याने दिलेले फळ राज्याच्या हातून पडले व फुटले. त्यातून एक तेजस्वी हिरा बाहेर पडला. राजाने तो हिरा रत्नपारख्याकडे दिला व त्याचे मोल विचारले. तो हिरा अमूल्य होता.

रत्नपारखी म्हणाला, "महाराज याचे मोल होऊच शकणार नाही." त्याबरोबर राजाने सर्व फळे आणवली व फोडली. प्रत्येकात एक एक अमूल्य हिरा होता.

ते पाहून राजाने विस्मयाने विचारले, "मुनीराज, हे दिव्य हिरे मला का देत आहात?"

तो योगी म्हणाला, "राजा, आयुष्य – विद्या – गृहछिद्र – मंत्र – मैथुन – औषध – दान – मान – अपमान या गोष्टी चारचौघात उघड सांगू नयेत, असे धर्मशास्त्र सांगते. म्हणून याचे उत्तर तुला एकांतात सांगेन."

तेव्हा राजा योग्याला घेऊन आपल्या खलबतखान्यात गेला. योगी म्हणाला, "राजा, गोदावरीतीरी स्मशानात मी मंत्रसिद्धी करणार आहे व त्यामुळे अष्टसिद्धी मला प्राप्त होतील व तुझेही कल्याण होईल. यासाठी तुला विनंती करतो, की एक रात्र तू शस्त्रसज्ज होऊन माझ्याजवळ एकटा राहावयास पाहिजे."

राजाने योग्याला मदत करण्याचे आश्वासन दिले व त्याप्रमाणे भाद्रपद वद्य चतुर्दशीला मंगळवारी रात्री राजा सशस्त्र गोदावरीतीरी स्मशानात हजर झाला. योगी अतिशय आनंदला. योग्याने भयानक साहित्याने पूजा मांडली होती. असंख्य भुते, डाकिनी, हडळी गोंगाट करत होत्या.

योगी राजाला म्हणाला, "राजा, येथून दक्षिणेस दोन कोसावर फार मोठे स्मशान आहे. तेथे एका झाडावर एक प्रेत लोंबकळत आहे ते घेऊन ये."

राजा या कामगिरीवर निघाला अन् एकदम प्रचंड मुसळधार पावसाला प्रारंभ झाला. भुतांनी-हिंस्र पशुंनी एकच गदारोळ उडवला. या सर्व भीषण प्रकारांना, संकटांना पार करून राजा एकदाचा त्या प्रचंड स्मशानात पोहोचला आणि सर्वत्र भुते, डाकिणी, हडळी महाभयंकर रूपात राजावर धावून त्याला भिववू लागली. राजा क्षणभर बावरला; परंतु तो अतिशय शूर व निधड्या छातीचा असल्याने दुसऱ्याच क्षणी त्याने आपल्या कार्यास आरंभ केला. त्याने झाडावर लोंबकळणारे प्रेत शोधून काढले. तो झाडाजवळ येताच झाडाला एकदम आग लागली. सर्व भुतावळ भयंकर आवाजात किंचाळत होती, तरी तो तसाच झाडावर चढला व त्याने लोंबकळणाऱ्या प्रेताची दोरी कापताच प्रेत खाली पडले; पण किंचाळून परत दोरीला लटकू लागले. राजाने पुन्हा दोरी तोडली व प्रेत खांद्यावर टाकून तो माघारी वळला.

प्रेतातील वेताळ म्हणाला, "राजा तू मला कोठे घेऊन जात आहेस?"

राजा म्हणाला, "मी ज्या योग्याला वचन दिले आहे त्याच्याकडे."

वेताळ म्हणाला, "हे बघ, तू न बोलता-मौनाने चालणार असशील तरच मी तुझ्याबरोबर येईन. बोललास तर परत झाडावर लोंबकळत राहीन."

राजा म्हणाला, "कबूल आहे मला." तो मार्ग आक्रमू लागला. वेताळ म्हणाला, "हे राजा, पंडित व चतुर लोकांप्रमाणे आपणही चांगल्या प्रकारे गोष्टी सांगत वेळ घालवू." आता मी तुला एक गोष्ट सांगतो ती लक्ष देऊन ऐक—

## कथा पहिली



# अविचारी राजा

वाराणशीचा राजकुमार वज्रमुकुट आपल्या चतुर मित्र प्रधान पुत्रासह शिकारीसाठी रानात आला होता. मनपसंत शिकार मिळाल्याने दोघेही खूष झाले होते व विश्रांतीसाठी एका सुंदर तळ्याकाठी विसावले. राजकुमाराला झोप येत नसल्यामुळे तो तळ्याकडेने सृष्टीसौंदर्य पाहात हिंडत होता. इतक्यात त्याचे लक्ष तळ्याकडे गेले नि तो मुग्ध होऊन पाहातच राहिला. एक अत्यंत सुंदर राजकन्या तळ्यात आपल्या सखींसह निःसंकोचपणे जलक्रीडा करीत होती. जलक्रीडा संपवून तळ्याकाठी येताच तिचे लक्ष राजकुमाराकडे गेले. राजकन्या गोंधळली, लाजली व झटकन तिने आपल्या हातातील कमलपुष्प कानावर ठेवले. तोंडाशी नेऊन आपल्या शुभ्र नाजूक दातांनी कमळाचा नाजूक चावा घेतला व हृदयाशी धरून हास्यमुद्रेने गमन केले. राजकन्या निघून गेल्यावर राजकुमार भानावर आला.

त्याच वेळी त्याच्या मित्राने पाठीवर थाप मारून विचारले, "काय महाराज, कशात गुंग झालात?"

राजकुमाराने घडलेली हकीकत सांगितली. ती ऐकून मित्राने त्याची खूप चेष्टा केली. राजकुमार गंभीर मुद्रेने म्हणाला, "मित्रा, चेष्टा नको करू. खरंच ती सुंदरी माझी पत्नी नाही झाली तर मी जिवंतच रहाणार नाही."

मित्राने त्याच्याकडून पुन्हा सविस्तर घडलेली गोष्ट ऐकून घेतली व म्हणाला, "मित्रा हे तर सोपे आहे. त्या सुंदरीने फूल कानावर ठेवले. याचा अर्थ ती कर्नाटक देशाची होती. दातांनी चावले त्या अर्थी दंडवटराजाची

कन्या असावी. फूल हृदयाशी धरले म्हणजे तुला हृदयात जपून ठेवले आहे. फूल कमळाचे म्हणजे तिचे नाव पद्मा असणार!"

चतुर मित्राचा योग्य खुलासा ऐकून राजपुत्राला फार आनंद झाला व ते दोघे लगेच कर्नाटकाच्या प्रवासाला निघाले. कर्नाटकच्या राजधानीत पोहचताच त्यांनी धर्मशाळेत मुक्काम केला.

त्या धर्मशाळेत एक म्हातारी आजी राहात होती. या दोघांना पाहाताच तिने त्यांची चौकशी केली. तिने मोठ्या आनंदाने त्या दोघांना आपल्या घरात बोलावले. बोलताना आजीबाई राजवाड्यातच कामाला होती हे समजल्याने दोघांना फार आनंद झाला. त्यांनी आपले काम आजीला सांगताच तिने मदत करण्याचे कबूल केले.

दुसरे दिवशी राजकन्येला "तुला तळ्याकाठी भेटलेला राजकुमार आल्याचे सांगितले." राजकन्येने तिच्या गालावर चंदन बुडविलेल्या दोन्ही हाताने आपली बोटे उठविली व म्हणाली, "मूर्ख म्हातारे, तू इथून ताबडतोब निघून जा!"

आजी दुःखी मुद्रेने घरी गेली व तिने घडलेली हकीकत त्या दोघांना सांगितली. चतुर मित्र म्हणाला, "आजी, चिंता नको. निरोप मिळाला!" पुढे तो म्हणाला, "कुमार, चंदनाची दहा बोटे, म्हणजे चांदण्या रात्री दशमीला ती तुला भेटणार आहे!"

राजकुमाराला आनंद झाला. दहा दिवसानंतर आजी पुन्हा राजकुमारीला भेटली. तेव्हा राजकुमारी काही न बोलता तिने आपली तीन बोटे केशरात बुडविली. म्हातारीचे हातावर उठविली व तिला जायला सांगितले. म्हातारी खिन्न होऊन घरी आली व तिने घडलेली हकीकत सांगितली.

त्यावर चतुर मित्र म्हणाला, "कुमार महाराज, राजकन्या पद्मावती तीन दिवस रजःस्वला असल्याने भेटू शकत नाही तेव्हा धीर धर!"

राजकुमार सुस्कारला, "हं, ठीक आहे."

तीन दिवसानंतर म्हातारी पुन्हा राजकन्येच्या भेटीस गेली. तिला पाहाताच राजकन्या चिडून म्हणाली, "थेरडे तुझे काळे तोंड दाखवायला कशाला परत-परत येतेस? विटे, या थेरडीला पश्चिमेकडच्या खिडकीतून हाकलून दे पाहू. मेली नको ती माणसे डोळ्यांपुढे येत आहेत."

म्हातारी पुन्हा कडू तोंडाने परतली व आल्यावर घडलेले सर्व सांगितले. चतुर मित्र आनंदाने म्हणाला, "आजी हे घ्या बक्षीस. काम झाले. आज राजकुमार रात्री पश्चिमेच्या खिडकीतून राजकुमारीला भेटायला जातील." राजकुमाराचा आनंद गगनात मावेना.

रात्र झाल्यावर दोघे मित्र उत्तम पोषाख करून निघाले. राजवाडा जवळ येताच मित्र राजकुमाराला म्हणाला, "मित्रा, मी बाहेर थांबतो. तू आत जा!"

राजकुमार पश्चिमेच्या खिडकीतून महालात आला. राजकन्या पद्मावतीही वाटच पाहात होती. तिने राजकुमाराचे अगत्याने स्वागत केले. दोघेही एकमेकांना इतके आवडले, की त्यांनी लगेच गांधर्व विवाह केला. एकमेकांच्या प्रेमपूर्ण संगतीत रात्र कशी संपली ते त्यांना समजलेच नाही. राजकुमाराचा मित्र बिचारा वाट पाहून थकला आणि शेवटी घरी गेला. पहाटे राजकुमाराला आपल्या मित्राची आठवण झाली.

तो राजकन्येला म्हणाला, "अरेरे, माझा मित्र वाट पाहून कंटाळून गेला असेल अगदी. तुझ्या सहवासात अगदी विसरूनच गेलो मी."

राजकन्येने विचारले, "काय? आपला मित्रही बरोबर आलाय?"

राजकुमार म्हणाला, "होय. माझा मित्र अतिशय हुशार व चतुर आहे. त्याच्यामुळेच तुझे संदेश मला समजले व आपली भेट झाली."

राजकन्या म्हणाली, "तर मग जाताना या आपल्या दासीची भेट म्हणून ही मिठाई त्याला द्यावी."

राजकुमार प्रसन्नतेने म्हणाला, "खरंच, पद्मा किती चांगली आहेस तू?" राजकुमाराने मोठ्या कष्टाने पद्माचा निरोप घेतला.

म्हातारीच्या घरी आल्याबरोबर राजकुमाराने मित्राला कडकडून मिठी मारली व सर्व वर्तमान सांगून म्हणाला, "तुझ्या वहिनीने मोठ्या प्रेमाने तुला ही मिठाई पाठवली आहे. फक्त तुझ्यासाठीच. मी तुकडाही खायचा नाही. सर्व तूच खायचीस, असे शपथ घालून तिने सांगितले आहे."

हे ऐकून राजकुमाराच्या मित्राला शंका आली व त्याने मिठाईतील तुकडा जवळच्याच मांजरीला घातला आणि काही क्षणातच ती मृत झाली. हे पाहून राजकुमाराला फार वाईट वाटले व तेवढाच रागही आला. तो रागावून म्हणाला, "अशा दुष्ट बाईचे तोंडही पाहायला नको. आपण परत आपल्या राज्यात जाऊ!"

मित्र म्हणाला, "असे झाले तर राजकन्या समजेल, की हे घाबरून निघून गेले. असे नको व्हायला. तिला या वाईट कृत्याबद्दल अद्दल घडली पाहिजे. तू आता असे कर, आज नेहमीप्रमाणे राजकन्येकडे जा. तिच्याशी नेहमीप्रमाणे वाग व संधी साधून तिच्या मांडीवर बिब्याच्या दोन फुल्या अन् त्रिशूल काढून निघून ये."

राजपुत्र नेहमीप्रमाणे राजकन्येशी प्रेमाने वागला व आपले काम साधून पहाटे निघून गेला.

दुसरे दिवशी या दोन मित्रांनी साधूचा वेष धारण केला. एक गुरु व दुसरा शिष्य! शिष्य झालेला राजकुमार एका मोठ्या सराफाचे पेढीवर एक मौल्यवान हार विकण्यास गेला. तो मौल्यवान हार राजघराण्यातील होता. तो हार पाहाताच शिपायांनी शिष्यास पकडले.

शिष्य ठरल्याप्रमाणे घाबरत म्हणाला, "हा माझ्या गुरूंनी दिला आहे विकायला!"

तेव्हा शिपायांनी गुरूलाही पकडले व दोघांना राजाकडे नेले. तो हार पाहून राजाने विचारले, "साधुमहाराज, हा राजघराण्यातील हार आपल्याकडे कसा?" तेव्हा साधू म्हणाला, "हे राजा, अमावस्येच्या रात्री मी स्मशानात मंत्रसाधना करत होतो तेव्हा एक सुंदर; पण अतिशय भयानक



राजकुमारीचे मांडीवर फुल्या व त्रिशूळ दिसले,
हे पाहून राजाला फार वाईट वाटले.

हडळ माझ्या साधनेत विघ्न निर्माण करावयास तेथे आली; पण मी मंत्रांनी तिला जखडून तिच्याजवळील हा अलंकार काढून घेतला व तिच्या मांडीवर दोन फुल्या व त्रिशूळ काढून तिला हाकलून दिले!"

राजाने लगेच राजघराण्यातील स्त्रियांची तपासणी केली तेव्हा राजकुमारीचे मांडीवर फुल्या व त्रिशूळ दिसले, हे पाहून राजाला फार वाईट वाटले; पण हडळीला महालात तरी कसे ठेवणार? असा विचार करून राजाने राजकुमारीला रानात हाकलून दिले.

हे दोन साधूही तडक रानात गेले. राजकुमारी पद्मावतीने त्यांना पाहाताच त्यांची मनापासून क्षमा मागितली. राजपुत्र मित्रासह खऱ्या रूपात प्रगट झाला व त्या दोघांनी तिला क्षमा करून आपल्या बरोबर आपल्या राज्यात नेले.

एवढे बोलून वेताळाने विचारले, "राजा, ते दोन मित्र, राजकन्या व राजा यात दोषी कोण?"

विक्रम राजा म्हणाला, "राजपुत्र व त्याचा मित्र यांनी मित्रकर्तव्य केले. राजकन्या चंचल स्त्रीच्या स्वभावानुसार वागली; पण दोष राजाचा आहे. त्याने अविचाराने पूर्ण चौकशी न करताच ताबडतोब आपल्या कन्येला रानात हाकलून दिले.

विक्रमराजाने मौन सोडताच वेताळ गुप्त झाला व पहिल्यासारखा झाडाला लोंबकळू लागला.

## कथा दुसरी

# स्वामीभक्त वीरसिंह



विक्रम पुन्हा झाडावर चढला. प्रेत खांद्यावर टाकले व चालू लागला. प्रेतातील वेताळ बोलू लागला. "राजा, आता तुला दुसरी गोष्ट सांगतो. ती ऐक–"

इंद्रापूरचा राजा शूरसेन याच्या दरबारात एकदा एक उमदा तरुण आला. त्याला पाहाताच राजाचे त्याच्याविषयी एकदम चांगले मत झाले.

राजाने त्या तरुणाला, वीरसिंहाला विचारले, "आपले काय काम आहे?"

तो म्हणाला, "मला आपल्याकडे नोकरी हवी आहे."

"ठीक आहे, पगार काय घेणार?"

वीरसिंह आत्मविश्वासाने म्हणाला, "हजार मोहरा दरमहा."

दरबारी लोकांनी हसून त्याची टिंगल उडविली; पण राजाला माणसांची उत्तम पारख होती. त्याने वीरसिंहाला राजवाड्यावर पहारा करण्याचे काम दिले. तो दिलेले काम ऊन-पाऊस-थंडी कोणत्याही परिस्थितीत चोख बजावत असे. राजाने त्याची हरतऱ्हेने परीक्षा घेतली. तो इमानी व कर्तव्यदक्ष आहे, हेच आढळून आले.

मग कुतूहलाने राजाने "तो आपल्या पगाराचे काय करतो," ते हेराकरवी जाणून घेतले. हेराने सांगितले, की "महाराज, वीरसिंहाने पगारापैकी अर्ध्या मोहरा गोरगरिबांना वाटल्या व अर्ध्या आपल्या पत्नीला घरखर्चाला दिल्या." हे ऐकून राजा त्याच्यावर जास्तच प्रेम करू लागला.

एके रात्री दूरवर कुणा स्त्रीचा रडण्याचा राजाला भास झाला. त्याने वीरसिंहाला कोण रडते आहे, याची चौकशी करण्याचा हुकूम दिला. वीरसिंह जाताच राजाही वेष बदलून त्याच्या मागे गेला. स्मशानात एक सुंदर स्त्री ओक्साबोक्शी रडत होती.

वीरसिंहाने जवळ जाऊन विचारले, "बाई तू रडतेस का?"

ती म्हणाली, "वीरसिंहा, मी प्रत्यक्ष पृथ्वी आहे व लवकरच मी अनाथ होणार म्हणून मला वाईट वाटत आहे."

वीरसिंहाने विचारले. "म्हणजे काय?"

ती म्हणाली, "माझ्यावर राज्य करणारा राजा शूरसेन लवकरच मरणार आहे."

वीरसिंहाने विचारले, "देवी, यावर काही उपाय नाही का?"

पृथ्वी म्हणाली, "आहे; पण महाभयंकर आहे. तुझा मोठा मुलगा जवळच्याच चंडिका देवीला बळी दिलास तर राजावरचे संकट टळेल!"

वीरसिंह घाईने आपल्या घरी आला व त्याने आपल्या पत्नीला आणि मुलाला घडलेली हकीकत सांगितली. तेव्हा त्याचा वीर पुत्र म्हणाला, "जर आपल्या राज्यावरील संकट टळत असेल तर मी बळी जायला आनंदाने

तयार आहे व ते तिघेही देवीच्या देवळात गेले व वीरसिंहाने देवी चंडिकेपुढे आपल्या मुलाला बळी दिले. मुलगा मेलेला पाहून वीरसिंहाचे पत्नीने दुःखाने आपला प्राण सोडला. पत्नी व मुलगा मृत झालेला पाहून वीरसिंहालाही फार दुःख झाले व त्याने हात जोडून राजाचे अभिष्ट चिंतून आपल्या तलवारीने आपले शिर तोडून देवीच्या पायावर वाहिले.

हा सर्व प्रकार राजा गुप्तपणे पाहात होता. आपल्या भल्यासाठी तीन जिवांची झालेली हत्त्या पाहून राजालाही फार दुःख झाले व तो देवीपुढे जाऊन आपल्या तलवारीने आपलेही शीर तोडू लागला; परंतु तलवारीचा घाव मानेवर बसण्यापूर्वीच देवीने प्रगट होऊन राजाचा तलवारीचा हात पकडला व म्हणाली, "हे राजा, मी प्रसन्न झाले आहे. काय वर हवा तो माग." राजा हात जोडून आनंदाने म्हणाला, "हे देवी, माझा वीरसिंह त्याच्या पत्नी मुलासह परत जिवंत व्हावा."

देवी म्हणाली, "तथास्तु!" आणि वीरसिंह आपल्या पत्नी-मुलासह जिवंत झाला. राजा गुप्तमार्गे आपल्या महाली निघून गेला होता.

दुसऱ्या दिवशी वीरसिंहाला "काल रात्री कोण रडत होते?" म्हणून विचारले असता वीरसिंह म्हणाला, "महाराज, एक वेडी स्त्री रडत होती!" खरा सज्जन आपली बढाई कधीच सांगत नाही.

एवढी गोष्ट सांगून वेताळाने विक्रमास विचारले, "वीरसिंह, त्याची पत्नी, त्याचा पुत्र अन् राजा यात अधिक त्याग कोणाचा?"

विक्रम म्हणाला, "वीरसिंह राजाचा नोकर होता. आपल्या स्वामीसाठी त्याग करणे त्याचे कर्तव्यच होते. त्याचप्रमाणे पत्नी व पुत्राने वीरसिंहाची आज्ञा पाळणे हे त्यांचे कर्तव्यच होते. राजाने मात्र सेवकासाठी मृत्यूस तयार होणे हा राजाचा त्यागच सर्वांत जास्त होय!"

विक्रमाचे मौन सुटताच प्रेतातील वेताळ नाहीसा झाला व परत झाडाच्या फांदीवर लोंबकळू लागला.

## कथा तिसरी



# सुवर्णमालिनी

विक्रम राजाने पुन्हा प्रेत आपल्या खांद्यावर घेतले व तो चालू लागला आणि खांद्यावरील प्रेतातील वेताळ बोलू लागला, ''आणखी एक गोष्ट सांगतो, ती ऐक—''

उज्जयनीला धुरंधर नावाचा प्रधान राज्यकारभार पाहात असे. त्याला वीरबल नावाचा एक मुलगा व सुवर्णमालिनी नावाची एक सुंदर मुलगी होती. सुवर्णमालिनी सुंदर असल्याने अनेक तरुणांनी तिला मागणी घातली होती; परंतु प्रधानाची इच्छा होती, की आपल्या सुंदर मुलीला शूर व सद्गुणी पती मिळावा.

एकदा काही कामासाठी धुरंधर दक्षिण भारतात गेला होता. आपल्या लाडक्या कन्येची त्याला सारखी आठवण येई. तेथे त्याला एक सुंदर तरुण भेटला व त्याने सुवर्णमालिनीला मागणी घातली. हा तरुण प्रधानाला प्रथमदर्शनीच आवडला होता.

प्रधानाने त्या तरुणाला विचारले, ''तुला काय येतं ?''

''मी एक वैज्ञानिक आहे,'' तो म्हणाला, ''तुम्हांला एक नमुना दाखवतो.'' असे म्हणून त्या तरुणाने अत्यंत सुंदर उडणारा रथ तयार केला. तो पाहून प्रधानाने खूष होऊन त्याला आपली मुलगी देण्याचे कबूल केले व त्याला घेऊन उज्जयनीला आला.

अन् काय योगायोग पाहा... त्याच वेळी त्याच्या मुलाला, वीरबलाला व पत्नीलाही एक-एक असे दोन सुंदर व हुषार, शूर तरुण भेटले. त्यांनीही सुवर्णमालिनीला मागणी घातली. त्या दोघांपैकी एक तरुण उत्तम ज्योतिषी

होता व दुसरा अत्यंत शूर होता. असे हे तीन वर एकाच वेळी राजवाड्यात आले. हे पाहून सर्वच गोंधळले.

इतक्यात सुवर्णमालिनी नाहीशी झाली. हे ऐकून सर्वांना फार फार दुःख झाले. त्यावेळी त्या तीन वरातील एक तरुण पुढे येऊन म्हणाला, "काही घाबरू नका. मी सांगतो सुवर्णमालिनी कुठे गेली ते!" त्याने ज्योतिष्य-विद्येने सांगितले, "सुवर्णमालिनीला धूमकेतु राक्षसाने विंध्य पर्वतावर पळवून नेले आहे." त्याच वेळी दुसरा वर पुढे आला व म्हणाला, "चला आपण माझ्या उडत्या रथातून जाऊ म्हणजे लगेच आपण तेथे पोहोचू!"

सर्व रथात बसले व आकाशमार्गे विंध्य पर्वतावर क्षणार्धात पोहोचले. समोर धुमकेतू राक्षस येताच तिसऱ्या तरुणाने मोठ्या शौर्याने त्याच्याशी घनघोर संग्राम करून त्या राक्षसाला ठार केले व सुवर्णमालिनीची सुटका केली. सर्वांना आनंद झाला.

राजवाड्यात येता येताच तिघे म्हणू लागले, "माझ्यामुळेच सुवर्णाची सुटका झाली. तिचे माझ्याशीच लग्न झाले पाहिजे."

सर्व चिंताक्रांत झाले. "आता विक्रमा तूच सांग, सुवर्णाचे कोणाशी लग्न करावे?" वेताळाने विचारले.

विक्रम राजा म्हणाला, "वेताळा, ज्या शूर वीराने आपल्या जीवावर उदार होऊन, राक्षसास ठार करून सुवर्णास सोडविले त्याच्याशीच तिने लग्न करावे. कारण इतर दोघे – एकाने सुताराचे व दुसऱ्याने ज्योतिष्याचे काम केले."

राजा बोलताच वेताळ त्याच्या खांद्यावरील प्रेतासह गुप्त झाला व पुन्हा पहिल्याच झाडावर लोंबकळू लागला.

***



कथा चौथी



# जास्त दुष्ट कोण ?

विक्रमानेही नेटाने परत ते प्रेत आपल्या खांद्यावर घेतले व मार्गक्रमण करूलागला. प्रेतातील वेताळ राजाला म्हणाला, "राजा, खरंच तू करारी अन् कष्टाळू आहेस. तुझ्या करमणुकीसाठी आणखी एक गोष्ट सांगतो ती ऐक–"

पाटलीपुत्राचा राजा केशरीमल याच्याजवळ एक मनुष्यवाणीने बोलणारा पोपट होता. काही दिवसांनी राजाचा विवाह मगध राजाची गुणसंपन्न, सुंदर कन्या – चंद्रप्रभाशी थाटात झाला. चंद्रप्रभेजवळ एक बोलणारी मैना होती. राजाने या दोघा राघू-मैनेला एकाच सुंदर पिंजऱ्यात ठेवले.

एके दिवशी पिंजऱ्यातून जोरजोराने भांडणाचा आवाज राजा-राणीला ऐकू आला. ते पाहातात तो पोपट मैनेला म्हणत होता, "तू माझ्याशी लग्न कर."

मैना तारस्वराने म्हणत होती. "पुरुष फार दुष्ट असतात. मी नाही तुझ्याशी लग्न करणार."

पोपट म्हणाला, "साफ खोटं, स्त्रियाच फार दुष्ट असतात."

राजा मैनेला म्हणाला, "मैने, तुझे म्हणणे आधी सांग."

मैना म्हणाली, "मी आपणास गोष्टच सांगते ती ऐका." मैना गोष्ट सांगू लागली–

वैशाली नगरीत धनदास नावाचा एक व्यापारी राहत होता. त्याच्या वडिलांनी त्याला अमाप संपत्ती ठेवली होती. अर्थातच फुकटातली संपत्ती

धनदासाने रात्रंदिवस उधळली आणि भिकारी झाल्यावर आपले गाव सोडून तो चंदनपुरला आला व आपल्या वडिलांचे स्नेही देवदत्तांना बनावट थापा मारून, गोडगोड बोलून त्यांचे मन जिंकले.

देवदत्तांनी त्याला मोठ्या प्रेमाने आपल्याजवळ ठेवून घेतले व आपली सुंदर सद्गुणी मुलगी – लक्ष्मीशी लग्न लावून दिले व खूप संपत्ती देऊन



धनदासाने आपल्या पत्नीचे अंगावरील सर्व दागिने काढून घेतले व तिला फसवून विहीरीत ढकलून दिले.

जावयाला निरोप दिला. वाटेत धनदासाने आपल्या पत्नीचे अंगावरील सर्व दागिने काढून घेतले व तिला फसवून विहीरीत ढकलून दिले. संपत्ती घेऊन घरी आला व रोज संपत्ती उधळू लागला. इकडे विहीरीत पडलेली त्याची पत्नी लक्ष्मी तिच्या सुदैवाने वाचली व कशीबशी वडिलांचे घरी पोहोचली.

लक्ष्मी पतिव्रता असल्यामुळे तिने घडलेली हकीकत दडवून खोटेच सांगितले, " आम्ही रस्त्याने जात असता दरोडेखोरांनी आम्हांला लुटले व पतीला पकडून नेले. "

वडिलांना फार वाईट वाटले. त्यांनी तपास केला; पण सर्व खोटेच असल्यामुळे जावई सापडणार कुठून ? धनदास सर्व संपत्ती उधळून संपताच चंदनपूरला आला. दारातच त्याला पत्नी दिसली. धनदास चिंतेत पडला; पण त्याच्या पत्नीने त्याला घरातं नेऊन वडिलांना ही वार्ता सांगितली. दुष्ट धनदासाला फार आनंद झाला. तो तेथेच चैनीत राहिला.

एके दिवशी पत्नी झोपली असता तिला ठार करून तिचे मौल्यवान अलंकार व पैसे घेऊन त्याने पोबारा केला.

मैना पुढे म्हणाली, "अशा नीच पुरुषावर विश्वास टाकल्यामुळे लक्ष्मी प्राणास मुकली. पुरुषजात केवढी दुष्ट आहे; म्हणून मी या पुरुषाशी लग्न करणेच अशक्य."

"महाराज, आता माझे ऐका," पोपट तावातावाने म्हणाला. पोपट पुढे सांगू लागला –

विशाखानगरीत बापूशेठ नावाचा श्रीमंत वाणी रहात होता. त्याला एक सुहासिनी नावाची सुंदर मुलगी होती. बापूशेठने तिचे लग्न एका सत्शील तरुणाशी सुखराजशी मोठ्या थाटातं केले; परंतु सुहासिनीचे प्रेम दुसऱ्याच एका तरुणावर होते. सुखराज रात्री झोपला, की रोज ती आपल्या प्रियकराकडे जात असे.

एके दिवशी सुहासिनी नेहमीप्रमाणे शृंगार करून लपत-छपत आपल्या प्रियकराकडे निघाली. हे तिच्याच घरात शिरणाऱ्या चोराने पाहिले. त्याच्या मनात विचार आला, की "इतक्या रात्री ही सुंदरी सजून कोठे जात आहे?" तो चोर चोरी करायचे सोडून तिचा पाठलाग करू लागला. प्रियकराकडे आल्यावर पाहते तो प्रियकर मृतावस्थेत आहे. कारण कोतवालाने त्याच्या गुन्हाची शिक्षा मृत्यूदंड दिली होती. ते पाहून सुहासिनी प्रियकराजवळ बसून रडू लागली.

तेथे राहाणाऱ्या वेताळाला या व्यभिचारिणीचा फार संताप आला व तो प्रेतात शिरला. त्याबरोबर सुहासिनीच्या प्रियकराचे प्रेताने उठून झटक्यात

दातांनी तिचे नाक तोडले व तो प्रेताबाहेर पडून अदृश्य झाला. घाबरलेली, भेदरलेली, रक्तबंबाळ झालेली सुहासिनी धावतच घरी आली व अंगावरील वस्त्रे फाडून ओरडू लागली, "धावा धावा, माझा नवरा मला मारतो आहे. आई गं, माझं नाक तोडलं हो."

लोक जमा झाले. सुखराज डोळे चोळत उठून बसला. तो घरात शिरणाऱ्या लोकांनी त्याला पकडून भरपूर चोप देऊन राजासमोर उभे केले. राजाने सुहासिनीची अवस्था पाहून चौकशी न करताच त्याला ठार मारण्याचा हुकूम दिला. चोराला सुखराजची दया आली व निरपराध्याला शिक्षा होते आहे हे पाहून तो राजापुढे आला व म्हणाला, "महाराज, थांबा. अन्याय होतोय. मला अभय द्या."

राजा म्हणाला, "अभय आहे, बोल."

चोर सांगू लागला "मी एक चोर आहे," असे सांगून सर्व घडलेली हकीकत त्याने राजाला सांगितली; पण राजाचा विश्वास बसेना, तेव्हा चोराने हा प्रसंग घडला त्या जागी राजाला नेले. तपासात प्रेताच्या हातात नाक तोडलेले मिळाले व ते सुहासिनीचे आहे, हेही सिद्ध झाले तेव्हा राजाला सुहासिनीचा फार राग आला व तिचे दोन्ही कान तोडून राज्यातून हाकलून दिले व त्या चोराला हेरांचा प्रमुख केले.

गोष्ट संपताच पोपटाचा यक्ष झाला व मैनेची अप्सरा झाली. ते दोघे शापामुळे पक्षी झाले होते. त्यांना मुक्ती मिळून ते स्वर्गात गेले.

वेताळ विक्रमराजाला म्हणाला, "आता असं सांग, जास्त दुष्ट कोण, स्त्री की पुरुष?"

राजा म्हणाला, "फार कठीण प्रश्न आहे; पण काही पुरुष दुष्ट असले तरी सरासरी स्त्रियाच जास्त दुष्ट असतात."

राजाने उत्तर देताच वेताळ प्रेतासह गुप्त झाला व पहिल्या ठिकाणी झाडावर लोंबकळू लागला.

※ ※ ※

कथा पाचवी

# अधिक नाजुक कोण ?



विक्रमाने पुन्हा झाडावरील प्रेत काढून आपल्या खांद्यावर घेतले व वाट चालू लागला. त्याची जिद्द पाहून वेताळ म्हणाला, "राजा, कोणा दुष्ट मांत्रिकासाठी तू एवढे कष्ट घेतो आहेस? ठीक आहे. तुझ्या करमणुकीसाठी एक कथा सांगतो ती ऐक —"

फार पूर्वी काशीनगरात धर्मध्वज नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला तीन राण्या होत्या. तिघी अतिशय सुंदर आणि नाजूक होत्या. त्या तिघीत अधिक नाजुक कोण? याबद्दल नेहमी वाद चालू असे; परंतु राजालाही त्या प्रश्नाचे उत्तर देता येत नव्हते. त्या तिघींपैकी एकीचे नाव होते कमलिनी, दुसरीचे चंद्रावळी व तिसरीचे सुकुमारी.

एके दिवशी राजा कमलिनीबरोबर बागेत फिरत होता. बागेतील कमळाची फुले हातात घेऊन राजा लाडक्या राणीशी गप्पा मारीत होता. चुकून राजाचे हातातील कमळाचे फूल राणीच्या पायावर पडले. त्या फुलामुळे राणीच्या पायाला जखम झाली. ती रडू लागली.

राजाने दासींना हाक मारली. कमलिनीच्या पायावर उपचार करून तिला राजवाड्यात नेले. मग राजवैद्यांनी कमलिनीच्या पायाला पट्टी बांधली. औषध लावले.

एकदा चांदण्या रात्री राजा चंद्रावळीसह लतामंडपात क्रीडा करीत होता. काही वेळ गेला आणि त्या पानांतून चंद्रकिरण आत घुसले व चंद्रावळीचे अंगावर पडले. त्याचबरोबर "हाय हाय, भाजले! भाजले!" असे ओरडत चंद्रावळी तळमळू लागली. राजा घाबरला. त्याने "काय

झाले ?" असे विचारताच चंद्रावळी म्हणाली, "चंद्राचे किरण माझ्या अंगावर पडले व मी भाजले. हे पाहा फोड."

खरोखरच तिच्या अंगावर फोड आले होते. राजाने ताबडतोब तिला महालात नेले. दासी वाळ्याचे पंखे घेऊन तिला वारा घालू लागल्या. राजवैद्यांनी औषध देताच तिला झोप लागली.

आणखी काही दिवस गेले. राजा सुकुमारीला घेऊन नगरातून फिरत होता. जाता जाता एका घरातून मुसळाने कांडल्याचा आवाज ऐकू आला. त्या आवाजानेच सुकुमारीच्या अंगावर काळे निळे वळ उमटले. ती ओरडू लागली. राजाने रथ फिरवला. तो राजवाड्यात आला. राजवैद्यांनी तिलाही औषधोपचार केला.

"विक्रमा, आता तूच सांग या तिघीत अधिक नाजुक कोण होते ?"

"वेताळा, सुकुमारी ही सर्वात नाजुक होती. कारण मुसळाच्या नुसत्या आवाजाने तिच्या अंगावर वळ उमटले. कमलिनीच्या पायावर कमळाचे फूल पडले होते व चंद्रावळीला चंद्रकिरणांचा स्पर्श तरी झाला होता."

राजाचे उत्तर ऐकताच वेताळ राजाच्या खांद्यावरून गुप्त झाला. पुन्हा झाडावर जाऊन लोंबकळू लागला.



कथा सहावी

# राजकन्या खरी कोणाची?

विक्रम न कंटाळता पुन्हा त्या झाडाखाली गेला. त्याने ते प्रेत काढून आपल्या खांद्यावर घेतले व तो चालू लागला. वेताळ म्हणाला, "विक्रमा, तुझ्या सोशिकपणाची कमाल आहे! आता मी तुला आणखी एक कथा सांगतो. ती ऐक—"



शिवपूर येथे यशकेतु नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला शशिकला नावाची एक सुंदर मुलगी होती. एकदा ती सख्यांसह बागेत खेळत असता एक माजलेला हत्ती मुलींच्या रोखाने धावत आला. तेव्हा शशिकलेच्या सख्या घाबरून पळाल्या. मनःस्वामी नावाच्या एका तरुणाने तिला त्या माजलेल्या हत्तीपासून वाचवले.

हत्ती निघून जाताच राजकन्येला सोडून दिले; पण झाले काय? राजकन्येच्या स्पर्शाने त्याचे शरीर रोमांचित झाले. 'ही तरुणी आपल्याला पत्नी म्हणून हवी!' असे मनाशी ठरवून तो गुरूपाशी गेला. आपल्या गुरूजवळ त्याने आपली व्यथा सांगितली व म्हटले, "गुरुमहाराज, मला जर ती स्त्री पत्नी म्हणून मिळाली नाही तर मी देहत्याग करीन."

गुरूने पुष्कळ सांगून पाहिले; पण मनःस्वामी काही ऐकेना. अखेर त्याने आपल्याजवळच्या दोन गोळ्या काढल्या व एक स्वतः घेतली व दुसरी शिष्याला दिली. त्यामुळे झाले काय? गुरु एक वृद्ध माणूस बनला व मनःस्वामीची सोळा-सतरा वर्षांची अल्लड कुमारिका झाली.

नंतर या तरुणीला घेऊन वृद्ध माणूस राजाकडे आला व म्हणाला, "महाराज, ही माझी भावी सून आहे. मी हिला आणली; पण आता मुलगाच



राजकन्येचा विश्वास संपादन केल्यावर मनःस्वामीने आपल्या तोंडातील गोळी काढून टाकली व तो तरुण बनला.

कोठे गेला आहे तो सापडत नाही. आता हिला घेऊन कुठे फिरू? तरी मी मुलाला शोधून आणतो, तोपर्यंत हिचे रक्षण करा. अशी विनंती आहे. ''

राजाने बरं म्हटलं व त्या तरुणीला म्हणजे मनःस्वामीला राजकन्येकडे पाठवून दिले. थोड्याच दिवसात राजकन्येची व त्याची गट्टी जमली. राजकन्येचा विश्वास संपादन केल्यावर मनःस्वामीने आपल्या तोंडातील गोळी काढून टाकली व तो तरुण बनला. प्रथम राजकन्या बावरली; पण नंतर तिने मनःस्वामीचे मागणीस रुकार दिला. दोघेही रात्री विलासात दंग होऊ लागली.

एक दिवस काय झाले! राजा आपल्या परिवारासह प्रधानाच्या घरी गेला होता. प्रधानपुत्राचे लक्ष स्त्रीरूपात असणाऱ्या मनःस्वामीकडे गेले, त्याबरोबर त्याच्या मनाने घेतले, की 'ही स्त्री आपल्याला हवीच! ती मिळाली नाही तर आपण मरणार,' असे त्याला वाटू लागले. मुलगा आजारी

पडला. त्यामुळे प्रधान घाबरला. त्याने मुलाला आजाराचे कारण विचारताच मुलाने पित्याला खरे खरे सांगून टाकले. प्रधानालाही काय करावे ते सुचेना. अखेर त्याने नाईलाजाने राजाला ही गोष्ट सांगितली.

शेवटी राजाने आपल्या इतर सरदारांचा सल्ला घेतला. ते म्हणाले, "हे लग्न झाले नाही तर प्रधानपुत्र मरण पावेल. कदाचित प्रधान आपल्या विरुद्ध जाईल किंवा राजिनामा देईल. प्रधानासारख्या श्रेष्ठ मुत्सद्याला गमावण्यापेक्षा ब्राह्मणाचा वचनभंग झाला तरी चालेल.

अखेर राजाने या लग्नाला संमती दिली. त्याने स्त्रीरूपी मनःस्वामीला बोलावले व सांगितले, "हे मुली तुझे लग्न अजून झालेले नाही. मी तुझे लग्न प्रधानाच्या मुलाशी ठरविले आहे."

"महाराज, आपण सत्ताधीश आहात. काय हवे ते करण्याचा आपल्याला अधिकार आहे; पण माझी एक अट आहे."

"काय?"

"विवाह झाला, की लगेच त्याने (प्रधानपुत्राने) तीर्थयात्रेस जावे व तीन महिन्यांनी परत यावे. मग मी खऱ्या अर्थाने त्याची पत्नी होईन."

प्रधानपुत्राने ही अट मान्य करताच मोठ्या थाटाने विवाह झाला. लग्न होताच प्रधानपुत्र तीर्थयात्रेस निघाला.

आपल्या दोन्ही बायकांना "भांडण करू नका. बहिणी बहिणीसारख्या राहा." अशी त्याने आज्ञा केली.

काही दिवस गेले. एक दिवस प्रधानपुत्राची प्रथम पत्नी म्हणाली, "सखे, मला आता पतिराजाशिवाय अजिबात करमत नाही. मी त्यांच्या सहवासासाठी फार आतुर झाले आहे. आता यावर काही उपाय असेल तर सांग!"

तेव्हा मनःस्वामीने आपल्या तोंडातील गोळी बाहेर काढली व पुरुषरूपात तो सवतीजवळ उभा राहिला. हे पाहाताच त्या प्रधानपुत्राच्या पत्नीला आश्चर्य वाटले; पण ती आनंदित झाली. मनःस्वामीने तिचे सर्व

मनोरथ पूर्ण केले. विलासात रात्री रंगू लागल्या. आता तिला पतीची गरज नव्हती. काही दिवसांनी दोघेही घरातून पळून गेली.

गुरूला ही बातमी कळली. त्याला मनःस्वामीचा फार राग आला. त्याने आपला दुसरा शिष्य जयदेव याला बरोबर घेतले व तो राजाकडे गेला.

जयदेवाला — आपल्या पुत्राला — पुढे करून तो म्हणाला, "महाराज, याला शोधण्यासाठी इतका काळ गेला. आता याची पत्नी — जी आपल्याकडे सुरक्षित आहे — ती ह्याला द्यावी, म्हणजे मी तीर्थयात्रेस जाण्यासाठी मोकळा होईन."

राजा घाबरला. त्याने सर्व हकीकत त्या वृद्ध ब्राह्मणाला सांगितली व नमस्कार करून म्हटले, "मुनिराज, आपण काय हवे ते मागा, मी देतो; पण चुकीची मला क्षमा करा."



"मुनिराज, आपण काय हवे ते मागा,
मी देतो; पण चुकीची मला क्षमा करा."

तेव्हा गुरु म्हणाला, "ठीक आहे. मग तुझ्या मुलीचे माझ्या या मुलाशी लग्न करून दे."

राजाने ते मान्य केले. मोठ्या थाटात राजकन्येचा व जयदेवाचा विवाह झाला. त्यांचा सुखात संसार सुरू झाला. इकडे मनःस्वामीने प्रधान-पुत्राच्या पत्नीला सोडले व तो परत आला.

जयदेवाशी भांडण करून तो म्हणाला, "ही माझी सखी आहे. मला ती परत दे."

जयदेव "नाही" म्हणाला. गुरूने दोघांची खूप समजूत घातली; पण काही उपयोग झाला नाही. शेवटी त्यांची लढाई जुंपली व लढाईत दोघेही मरण पावले.

कथा संपल्यावर वेताळ म्हणाला, "विक्रमा, आता तूच सांग, मनःस्वामीने राजकन्येचा प्रथम उपभोग घेतला होता आणि जयदेवबरोबर तिचे लग्न झाले होते. मग ती स्त्री खरोखर कुणाची होती?"

"वेताळा, जयदेवाचा राजकन्येवर खरा अधिकार होता. कारण त्याचे व तिचे देवा ब्राह्मणासमक्ष विधीपूर्वक लग्न झाले होते. मनःस्वामीने नुसती मजा मारली होती. दुसरी स्त्री मिळताच हिला सोडून तो पळून गेला होता."

विक्रमाचे उत्तर ऐकताच वेताळ विक्रमाचे खांद्यावरून उडाला व झाडावर लोंबकळू लागला.



## कथा सातवी

# अधिक सत्त्वशील कोण?



विक्रमाने चिकाटी सोडली नाही. झाडाजवळ जाऊन त्याने ते प्रेत परत खांद्यावर घेतले व तो चालू लागला. वेताळ म्हणाला, "राजा, तू खरोखरच धन्य आहेस. आता मी आणखी एक कथा सांगतो ती ऐक–"

विलासपुरा नगरात कृष्णदास नावाचा एक फार मोठा सावकार रहात होता. त्याला चंद्रकला नावाची एक मुलगी होती. चंद्रकला चंद्राप्रमाणेच सुंदर होती. शिवाय पित्याच्या सर्व संपत्तीची वारस होती. चंद्रकला आता उपवर झाली असल्याने कृष्णदास काळजीत पडला होता. शेवटी तो राजाकडे गेला व म्हणाला, "राजन, माझी कन्या चंद्रकला अतिशय सुंदर आहे. ती आपल्याला अर्पण करावी असा माझा विचार आहे."

राजाचे जिवलग मित्र तेथेच उभे होते. राजाने त्यांना सांगितले, "मित्रांनो, तुम्ही मुलगी बघून या. ती जर पसंत असेल तर मी तिच्याशी लग्न करावयास तयार आहे. तुमच्यावर माझा पूर्ण विश्वास आहे."

झाले! राजाचे मित्र कृष्णदासाचे घरी गेले. चंद्रकलेला पाहून ते एकदम खूष झाले. इतकी सुरेख, सुलक्षणी, गुणी मुलगी आपण आजवर कधीच पाहिली नाही, असे सर्वांनी आपापल्या मनाशी कबूल केले.

येता येता एकजण म्हणाला, "मित्रा, जर महाराजांशी या कन्येचा विवाह झाला तर महाराज हिच्या महालातून बाहेर पडणार नाहीत. त्यांचे राज्यकारभारात लक्ष लागणार नाही."

"मग काय करू या."

"ही मुलगी कुरूप, कुलक्षणी आहे असे महाराजांना सांगू या." सर्वांना हा विचार पटला. मित्राचे मत ऐकून राजाने कृष्णदासास आपला नकार कळविला. शेवटी कृष्णदासाने चंद्रकलेचा विवाह राजाचा सेनापती बलदेवसिंग याच्याशी करून दिला. चंद्रकला सुखात होती.

काही दिवस गेले. चंद्रकला आपले काळेभोर केस मोकळे सोडून आपल्या वाड्याच्या गच्चीत उभी होती. योगायोगाने राजा त्याचवेळी रस्त्यावरून जात होता. सहज त्याने वर पाहिले. ही चंद्रमुखी दिसताच राजा तिच्यावर प्रेम करू लागला. त्याला तिचाच ध्यास लागला. राजाच्या खास सेवकाने राजाला विचारले "महाराज, आपण कसली चिंता करीत आहात? या सेवकाला चिंतेचे कारण सांगावे."

राजा म्हणाला, "वेड्या, तू काय करणार म्हणा; पण काय रे? त्या दिवशी आपल्याला बलदेवसिंगाच्या घराच्या गच्चीत उभी असलेली एक अप्सरा दिसली होती. ती कोण आहे? तिला पाहाताच माझे मन मोहित झाले आहे. तिच्याशिवाय मला दुसरे काहीच सुचत नाही."

सेवक म्हणाला, "महाराज, ती आपल्या बलदेवसिंग सेनापतीची धर्मपत्नी आहे."

"अरेच्च्या!"

"कृष्णदासास आपण नकार दिल्यामुळे त्याच्या मुलीचा – चंद्रकलेचा विवाह सेनापती बलदेवसिंगाच्याबरोबर करून दिला."

हे ऐकून राजा एकदम उदास बनला. आपल्या जिवलग मित्रांनी आपल्याला फसवले हे त्याच्या लक्षात आले. चंद्रकलेच्या विरहाने-विचाराने राजा क्षीण होत चालला. हळुहळू ही बातमी सर्वत्र पसरली. सेनापती बलदेवसिंगाला फार वाईट वाटले. तो राजासमोर येऊन उभा राहिला व म्हणाला, "सरकार आमची चूक झाली. क्षमा करा. मला चूक सुधारण्याची संधी द्या."

" सेनापती, काय बोलता आहात ? "

" महाराज, चंद्रकला माझी पत्नी आहे व मी आपला सेवक आहे. आज्ञा होईल तर तिला आता आपल्यासमोर हजर करतो. महाराज, मी स्वखुषीने पत्नीचे दान करत आहे. स्वीकार करावा. "

" हे पाहा, माझ्या निष्कलंक चारित्र्याला कलंक लागेल असे मी काहीही करणार नाही. तुम्ही जा. "

नाईलाजाने सेनापतीला मागे फिरावे लागले. चंद्रकलेच्या विचाराने झुरत राजा मरण पावला. राजाच्या मृत्यूला आपणच कारणीभूत झालो असे वाटून सेनापती बलदेवसिंगाने राजाच्या चितेत उडी टाकून आत्मसमर्पण केले. पतीने जीव दिला असे कळताच चंद्रकला सती गेली.


एवढी कथा सांगून वेताळ म्हणाला, " विक्रमा, या तिघात अधिक सत्त्वशील कोण आहे ? "

" राजाचे सत्त्व अधिक. "

" कसे काय ? "

" सेनापतीने स्वस्त्रीचे दान केले तरीही राजाने तिचा स्वीकार केला नाही; परंतु तिच्यावर खरोखर प्रेम बसले असल्याने प्राणत्याग केला. धन्याकरता जीव देणे हा सेवकाचा धर्मच आहे. चंद्रकला सती गेली. कारण पतीबरोबर सती जाणे हा स्त्रियांचा धर्मच आहे. तेव्हा राजाचेच सत्त्व अधिक आहे. "

राजाचा मौनभंग होताच वेताळ राजाचे खांद्यावरून उडाला व परत वृक्षावर लोंबकळू लागला.



## कथा आठवी

# मंदाकिनीचा पती कोण?



राजा विक्रम परत आला. वेताळाला त्याने खांद्यावर घेतले व तो चालू लागला. वेताळ गंभीरपणे उद्गारला, "वचनासाठी तू अनिवार कष्ट सोसतो आहेस. तेव्हा तुला मी आणखी एक गोष्ट सांगतो ऐक–"

पाटली नगरात एक धर्मनिष्ठ ब्राह्मण रहात होता. त्याला मंदाकिनी नावाची अतिशय लावण्यवती कन्या होती. तिच्या अप्रतिम लावण्याने मोहून जाऊन तीन सुंदर तरुण ब्राह्मणाकडे आले व तिघांनीही मंदाकिनीला मागणी घातली.

तिघेही ब्राह्मणकुमार होते. तरुण होते, विद्वान होते. मग हो कुणाला म्हणावे नि नकार कुणाला द्यावा? ब्राह्मणाला काही सुचेना. दुर्दैवाने पाणी भरावयाला गेलेल्या मंदाकिनीला साप चावला व ती मरण पावली. त्या तिघा तरुणांना दुःखाने वैराग्य प्राप्त झाले. त्यांच्यापैकी एकजण मंदाकिनीच्या चितेजवळच झोपडी बांधून संन्याशासारखा राहू लागला. दुसऱ्याने मंदाकिनीच्या अस्थी गोळा केल्या व तो गंगानदीकडे जावयास निघाला. तिसरा तीर्थयात्रेला निघून गेला.

तीर्थयात्रा करणारा ब्राह्मणकुमार हिंडता हिंडता हिमालयाच्या पायथ्याशी आला. तेथे एका ब्राह्मणाचे घरी तो उतरला होता. ब्राह्मणाने योग्य तो आदरसत्कार केला व त्याला जेवणासाठी आमंत्रणही दिले.

जेवताना काय झाले? यजमान पत्नी आपल्या मुलावर काही कारणाने संतापली. मुलगा हट्ट सोडीना. त्याबरोबर रागाच्या भरात तिने मुलाला



रागाच्या भरात तिने मुलाला उचलले आणि जळत्या चुलीत फेकून दिले.
आणि ब्राह्मणकुमार भीतीने थरथर कापू लागला.

उचलले आणि जळत्या चुलीत फेकून दिले. ब्राह्मणकुमार भीतीने थरथर कापू लागला. हे पाहून हसतच यजमान ब्राह्मण म्हणाला, " घाबरू नका. मी काय करतो ते पाहा. "

असे म्हणून त्याने कोनाड्यातील पोथी काढली व त्यातील एक मंत्र म्हणून त्याने चिमुटभर राख चुलीतील मुलाच्या रक्षेवर टाकली. त्याबरोबर ते पोर नाचतच बाहेर आले. हा चमत्कार पाहून ब्राह्मणकुमार थक्क झाला. त्याला आपल्या प्रियेची एकदम आठवण झाली.

रात्री संधी साधून त्याने ती पोथी पळवली व मजल दरमजल करत तो मंदाकिनीच्या गावाला येऊन पोहोचला. दैवयोगाने अस्थी टाकायला गेलेला ब्राह्मणकुमारही त्यावेळी तेथे येऊन पोहोचला होता. तिसऱ्या ब्राह्मणकुमाराने मंत्र म्हटला व हातातील राख मंदाकिनीच्या चितेवर टाकली. त्याबरोबर ती जिवंत होऊन त्यांच्यासमोर उभी राहिली. तिचे लावण्य आता सुवर्णाप्रमाणे

चमकत होते. तिला पाहाताच प्रथम तिघेही आश्चर्यचकित झाले व मग तिच्यासाठी झगडू लागले.

पहिला ब्राह्मण म्हणाला, "मी हिच्या चितेतील राखेचे रक्षण केले म्हणूनच ती जिवंत होऊ शकली, तेव्हा ती माझीच आहे."

दुसरा म्हणाला, "मी तिच्या अस्थी गंगेत टाकून आलो आणि त्या पुर्ण्यामुळेच तिला पुनर्जन्म मिळाला तेव्हा ती माझी आहे."

तिसरा म्हणाला, "माझ्या मंत्रसामर्थ्याने ती जिवंत झाली आहे. तेव्हा मीच तिचा पती आहे."

या तिघांचे भांडण काही संपेना.

वेताळ म्हणाला, "राजा, आता तूच सांग लावण्यवती मंदाकिनीने पती म्हणून कोणाचा स्वीकार करावा?"

"वेताळा, ज्या ब्राह्मणकुमाराने मंत्रसामर्थ्याने तिला परत जन्म दिला, तो तिचा 'धर्मपिता' होय. ज्याने तिच्या अस्थी गंगेत नेऊन टाकल्या तो 'धर्मपुत्र' आणि ज्याने तिच्या चितेचे रक्षण केले तोच तिचा पती होय."

राजाचे उत्तर ऐकताच वेताळ खांद्यावरून उडाला व झाडावर जाऊन लोंबकळू लागला.



## कथा नववी

# अधिक धैर्यवान कोण?



राजा तसाच माघारी फिरला. जंगलात जाऊन ते प्रेत परत आपल्या खांद्यावर घेताच प्रेतातील वेताळ बोलू लागला, "हे श्रेष्ठ पुरुषा, मी तुला आणखी एक कथा सांगतो."

हिमालयात एक गंधर्व नगरी होती. तेथे राजा धुमकेतू राज्य करीत होता. त्याला पुत्र नसल्याने तो अतिशय दुःखी होता. काही दिवसांनी कल्पवृक्षाच्या आशीर्वादाने त्याला पुत्र झाला. राजाने त्याचे नाव भीमकेतू ठेवले. भीमकेतू आपल्या चुलत भावांच्या बरोबर मोठा होत होता. भीमकेतू धार्मिक व परोपकारी होता. योग्यवेळी राजाने त्याला गादीवर बसविले व आपण वानप्रस्थाश्रमाला निघून गेला.

भीमकेतुच्या चुलत भावांना मोह सुटला. ते त्याच्यावर चालून आले. सर्वांचा पराभव करायला भीमकेतू समर्थ होता, तरीही क्षुल्लक राज्यापायी अनेक जीव मारले जावेत हे त्याला पटेना. त्यामुळे तो तेथून निघाला. मलय पर्वतावर त्याची व धुमकेतुची पुन्हा भेट झाली. दोघेजण ऋषीसारखा आश्रम बांधून राहू लागले.

एक दिवस ऋषीकुमारांबरोबर अरण्यात फिरत असताना त्याने एक लावण्यवती तरुणी देवासमोर भजन करत असताना पाहिली. त्याच क्षणी त्याचे तिच्यावर मन जडले. त्याने तिची चौकशी केली. ती राजा मलयकेतुची कन्या आहे हे त्याला समजले. त्याने राजकन्येला रीतसर मागणी घातली. आपली सर्व हकीकत त्याने राजा मलयकेतुला सांगितली. भीमकेतुच्या सदगुणांची कीर्ती मलयकेतू राजापर्यंत आलेलीच होती.

त्यामुळे राजाला हा जावई एकदम पसंत पडला. मोठ्या थाटामाटाने त्याने आपल्या कन्येचा विवाह भीमकेतुबरोबर करून दिला.

आता भीमकेतू राजवाड्यातील ऐश्वर्य भोगत होता. एके दिवशी तो व त्याचा मेहुणा शशिकांत दोघेजण हिंडत होते. एके ठिकाणी हाडांचा मोठा ढीग दिसल्याने भीमकेतुने मेव्हण्याला विचारले, "हे काय आहे?"

"ही नागपुत्रांच्या हाडांची रास आहे!"

"म्हणजे काय?"

"फार पूर्वी नागांच्या आईने गरूडाची आई विनिता हिला फसवून एक पण जिंकला होता. त्यामुळे विनिता नागांची दासी बनली होती."

"बरं मग?"

"विनितापुत्राने – म्हणजे गरूडाने – स्वर्गातून अमृतकलश आणून देऊन आपल्या आईची मुक्तता केली; पण त्यावेळेपासून गरूडाने नागांशी वैर धरले ते कायमचेच."

एवढे बोलून दोघेजण परत फिरले. भीमकेतुला मात्र ते ऐकून चैन पडेना. शिवमंदिरात जाऊन तो स्वस्थ बसला. थोडा वेळ गेला आणि तो रडण्याच्या आवाजाने एकदम भानावर आला.

आवाजाच्या रोखाने जात असताना त्याला एक वृद्ध स्त्री व एक तरुण मुलगा दिसला. त्या वृद्ध स्त्रीच्या मुखातूनच रडण्याचे स्वर बाहेर पडत असल्याचे लक्षात येताच तो तेथे थांबला व ऐकू लागला.

"बाळा शंखचूडा, मला सोडून जाऊ नकोस रे!" ती म्हणाली.

"आई-आई-"

"तू माझा एकुलता एक आधार आहेस. तू गेल्यावर मी जगू तरी कशी?"

"आई, शोक आवर व आपल्या घरी जा. मृत्यू अटळ आहे. मी तुला शेवटचा प्रणाम करतो. जा आई, परत जा. आता एवढ्यात तो गरूड येईल."

मुलाचे हे शब्द ऐकताच ती वृद्ध स्त्री जास्तच रडू लागली. त्याबरोबर भीमकेतू पुढे आला व तिला म्हणाला, " आई घाबरू नका. मी तुमच्या मुलाचे रक्षण करीन ? "

तेव्हा तो नागपुत्र शंखचूड म्हणाला, " धैर्यवान शूर पुरुषा, तुझा बळी देऊन मला माझा जीव वाचवायचा नाही. तुझ्यासारखे रत्न बळी देऊन माझ्यासारख्या सामान्याचा जीव वाचवणे योग्य होणार नाही. कृपा करून आपण येथून निघून जा. "

भीमकेतू काही बोलला नाही. तेथेच उभा राहिला. आईला पोचवण्यासाठी म्हणून शंखचूड थोडा दूर गेला. तेवढ्यात गरूड आला. त्याने भीमकेतूला नागपुत्र समजून उचलले. गरूडाच्या चोचीने भीमकेतुला जखमा झाल्या. त्यातून रक्त ओघळू लागले. शंखचूड परत येतो तो त्याला आपल्या जागेवर रक्त पडलेले दिसले. तो मनाशी म्हणाला, " घात झाला ! तो शूर पुरुष माझ्यासाठी बळी गेलेला दिसतो. "



तेवढ्यात गरूड आला. त्याने भीमकेतुला नागपुत्र समजून उचलले.

धावत धावत तो मलय पर्वतावर आला. मलय पर्वतावर गरूड भीमकेतुला खात होता.

" मांसाचा लचका तोडल्यावरही हसणारा हा प्राणी नागपुत्रच आहे का ? " असे गरूडाच्या मनात आले.

त्याने विचारले, " शूर पुरुषा, तू आहेस तरी कोण ? "

" मी नागच आहे. मला लवकर खाऊन टाक पाहू."

पण तेवढ्यात नागपुत्र शंखचूड तेथे आला व गरूडाला म्हणाला, " गरूडा, मी नाग आहे, मला खा. या साधुपुरुषाला सोडून दे. "

एवढ्यात भीमकेतुची पत्नी व इतर सर्वजण तेथे जमा झाले. सर्वजण रडू लागले. त्याबरोबर गरूड घाबरला, त्याने नीट निरखून पाहिले.

" या महात्म्याचे मांस मी खाल्ले. आता मी काय करू ? " असा विचार येऊन तो कष्टी झाला.

तेवढ्यात गौरी प्रकट झाली. तिने भीमकेतुवर अमृत शिंपडले. तो जिवंत झाला. त्याबरोबर देवांनी त्याच्यावर पुष्पवृष्टी केली.

भारावलेल्या स्वरात गरूड म्हणाला, " हे महात्म्या, माझ्या हातून नकळत अपराध घडला आहे. तुझी त्यागी वृत्ती पाहून मी प्रसन्न झालो आहे. तुला हवा तो वर माग ! "

तेव्हा भीमकेतू म्हणाला, " गरूडा, तू आजपासून नागांना खाऊ नकोस. शिवाय हे जे तरुण नागपुत्र मरण पावले आहेत, त्यांना पुन्हा जिवंत कर. "

हे ऐकताच गरूडाने स्वर्गात जाऊन अमृत आणले. त्या अस्थींवर शिंपडताच सर्व नाग जिवंत झाले व ते भीमकेतुचा जयजयकार करू लागले. आनंद झाल्याने प्रत्येक जण भीमकेतुची स्तुती करण्यात गर्क झाला. भीमकेतुची कीर्ती सर्व जगात पसरली.

एवढी कथा सांगून वेताळ विक्रमाला म्हणाला, " विक्रमा, भीमकेतू व शंखचूड यात अधिक धैर्यवान कोण ? "

विक्रम म्हणाला, "भीमकेतू धैर्यवान होता हे खरे. अनेक जन्म परोपकार करून सिद्ध झालेल्या भीमकेतुच्या धैर्याचे फार आश्चर्य वाटत नाही; परंतु शंखचुडाचे तसे नव्हते. मृत्यूच्या मुखातून सुटका झालेली असूनही आपल्याऐवजी बळी गेलेल्या दुसऱ्याची दया येऊन तो गरूडाच्या मागे धावत गेला. त्याने आपला देह अर्पण करण्याची तयारी दाखवली आणि म्हणूनच शंखचूडच जास्त धैर्यवान आहे."

विक्रमराजाने मौन सोडताच वेताळ गुप्त झाला व पहिल्यासारखा झाडाला लोंबकळू लागला.



कथा दहावी

## राजा गुणपती व वीरधवल

विक्रम राजा पुन्हा झाडावर चढला. प्रेत खांद्यावर टाकले व चालू लागला. प्रेतातील वेताळ बोलू लागला. "राजा, आता तुला दुसरी गोष्ट सांगतो. ती ऐक–"

मिथिला नगरीत गुणपती नावाचा राजा राज्य करीत होता. तो रसिक होता. विद्वानांचा योग्य तो आदरसत्कार करत असे. त्याची कीर्ती दशदिशांत दरवळत होती. ती ऐकून वीरधवल नावाचा दुसऱ्या देशातला एक शूर तरुण मिथिला नगरीत आला. तोही गुणी होता. या राज्यात आपल्या गुणांचे चीज होईल व आपणास भरपूर द्रव्य मिळेल अशी त्याला खात्री होती; पण दुर्दैवाने तसे काहीच घडले नाही.

गुणपती राजा वीरधवलाचे बाबतीत उदासीनच होता. पुष्कळ दिवस असेच गेले. एकदा काय झाले? राजा आपल्या लव्याजम्यासह शिकार करण्यासाठी म्हणून जंगलात गेला. दाट जंगलात शिरल्यावर राजा आपल्या परिवारापासून एकटाच पडला; परंतु वीरधवल राजाच्या पाठीमागे जात होता. एकटा पडलेला राजा क्षणभर स्तब्ध उभा राहिला.

तेव्हा वीरधवल एकदम पुढे झाला व राजाला म्हणाला, "महाराज, या जंगलात आता आपण दोघेच आहोत. सांगा! मी आपली काय सेवा करू?"

गुणपतीने वीरधवलला आपादमस्तक न्याहाळले व म्हटले, "काय रे, या वयात तू असा क्षीण, अशक्त का दिसतोस?"

"महाराज, ज्या धन्याकडे हजारोंचे पालनपोषण होते, त्या धन्याकडे माझ्या गुणांचे जर चीज झाले नाही तर तो दोष माझ्या कर्माचाच समजायला हवा. महाराज, ज्या परमेश्वराने मातेच्या उदरातही मला अन्नपाणी पोहोचवले तो दयाळू परमेश्वर मला नेहमी उपाशी ठेवील असे काही मला वाटत नाही."

"अस्सं?" गुणपती.

"महाराज, खरंच सांगतो, अपमान सोसून धन मिळविण्यापेक्षा मृत्यू बरा. मूर्खाची मैत्री, विनाकारण हसणे, स्त्रियांशी भांडण, दुर्जनाची चाकरी, नको तिथे बसणे व अशुद्ध भाषण या सहा गोष्टींनी मनुष्यास हलकेपणा येतो. शिवाय माणूस जन्मास येतो तेव्हाच त्याच्या भाग्यात आयुष्य, कर्म, विद्या आणि कीर्ती या गोष्टी लिहिलेल्या असतात, तेव्हा जे नशिबात असेल ते भोगलेच पाहिजे!"

राजा गुणपती वीरधवलाचे सर्व बोलणे लक्षपूर्वक ऐकत होता; परंतु तो बोलला काहीच नाही.

थोड्या वेळाने राजा म्हणाला, "मला भूक लागली आहे, काही खायला असेल तर दे."

वीरधवलाने खिशातले आवळे काढले व ते स्वच्छ पुसून राजाच्या हातात देत तो म्हणाला, "महाराज, हे घ्या. आपल्याला हे खाणे आवडणार नाही; पण गेली कित्येक वर्षे मी हेच अन्न खातोय!"

राजाने कसेबसे ते आवळे खाल्ले आणि ते दोघे वाट काढत जंगलाबाहेर आले. राजधानीत येताच राजाने खास दरबार भरवला. त्यात वीरधवलाची खूप स्तुती करून त्याला बरेच द्रव्य बक्षीस म्हणून दिले.

काही दिवसांनी राजाने वीरधवलाची एका खास कामगिरीवर नेमणूक केली. कामगिरीसाठी होडीत बसून सिंहलद्विपास जावयाचे असल्याने वीरधवल नावेत बसला. मध्यसमुद्रात नाव येताच एक चमत्कार घडला. समुद्राच्या पाण्यातून एक सुवर्णपताका वर आली. ती पाहून सर्वांनाच फार आश्चर्य वाटले. त्या पताकेवर सुंदर पुष्पमाला हलत होती.

इतक्यात समुद्रात वादळ सुरू झाले. वीरधवलाची नाव त्या पताकेकडे ओढली गेली. वीरधवलाने मोठ्या धैर्याने तलवार उपसून समुद्रात उडी टाकली. तो एकदम समुद्राचे तळाशी गेला. तिथे देवीचे एक सुंदर देऊळ होते.

वीरधवलाने देवळात जाऊन देवीला प्रणाम केला. तेवढ्यात शेजारच्या दारातून एक सुंदर तरुणी आत आली. असे असामान्य लावण्य वीरधवलाने आजपर्यंत बघितले नव्हते.

ती जेव्हा दर्शन घेऊन मागे फिरली तेव्हा वीरधवलही तिच्या मागोमाग जाऊ लागला. ती तरुणी एका महालात शिरली व पाठीमागून येणाऱ्या वीरधवलला म्हणाली, "महाराज, आपण अतिथी आहात, स्नान करून या. भोजन करा व मग विश्रांती घ्या."


सुंदरीच्या आज्ञेप्रमाणे एका दासीने त्याला स्नानगृह दाखवले. तो स्नान करू लागताच मजाच झाली.

त्याने सभोवार निरखून पाहिले. आपण आपल्या मिथिला नगरीतच आहोत असे त्याच्या लक्षात आले. तो तसाच राजाकडे गेला. राजाला सर्व हकीकत सांगितली.

राजा म्हणाला, "मित्रा, तुझ्या हकीकतीने माझे स्वतःचे कुतुहल जास्तच वाढले आहे. तेव्हा उद्या आपण दोघेजण कालच्याच वाटेने जाऊ या?"

झाले. दुसऱ्या दिवशी नावेत बसून दोघेजण निघाले. मध्यसमुद्रात येताच ती सुवर्णपताका वर आली, मोठे वादळ झाले आणि नौकेतून बाहेर उड्या टाकलेले ते दोघेजण कालच्याच देवळात येऊन बसले. कालच्याच प्रमाणे ती लावण्यवती देवळात आली व पूजा करू लागली. ते पाहाताच वीरधवल राजाला घेऊन बागेत गेला.

पूजा संपल्यावर ती स्त्री बाहेर आली. तिला दोन पुरुष दिसेनात. तेव्हा तिने दासीला पाठवून दोघांना आता बोलावून घेतले. नंतर नम्रपणे नमस्कार करून ती राजाला म्हणाली, "महाराज, आपण आमचे अतिथी आहात आता घरी चलावे."



"महाराज, आपण आमचे अतिथी आहात आता घरी चलावे."

"सुंदरी, माझ्या या मित्राने तुझ्या आदरातिथ्याची मला पूर्ण कल्पना दिली आहे आणि म्हणूनच पुन्हा त्याची प्रचीती घेण्याची आवश्यकता नाही."

"नाही! नाही! महाराज, मी मनापासून सांगते आहे."

"पण माझीच इच्छा नाही!"

"महाराज, माझी हकीकत तर ऐका. मी असुरेंद्र कालनेमी याची कन्या. विष्णूने माझ्या वडिलांचा वध केला. विश्वकर्माने सागराखालची ही दोन नगरे माझ्या वडिलांना दिली होती. आता ती माझी आहेत. मी आपली दासी आहे. आता यापुढे आपण सांगाल तशी वागेन."

"मग माझ्या या मित्राबरोबर लग्न कर व त्याला सुखी कर."

लावण्यवतीने होकार दिला. मोठ्या थाटाने दोघांचा विवाह झाला.

राजा वीरधवलाला म्हणाला, "मित्रा, तुझ्या आवळ्याच्या ऋणातून मी आता मुक्त झालो आहे. सुखाने रहा."

एवढी कथा सांगून वेताळ विक्रमाला म्हणाला, "हे राजा, आता तूच सांग, समुद्रात उडी टाकण्यात अधिक धैर्य कोणाचे राजाचे, की वीरधवलाचे?

"अर्थात् वीरधवलाचे धैर्य जास्त! कारण पुढे कोणते संकट येणार आहे हे माहीत नसताना त्याने भर समुद्रात उडी टाकली होती. राजाला उडी टाकल्यावर पुढे काय होणार आहे याची पूर्ण कल्पना होती." राजा विक्रमाने लगेच उत्तर दिले.

विक्रमाचे उत्तर ऐकताच वेताळ परत जंगलातील झाडावर जाऊन लोंबकळू लागला.



## कथा अकरावी

# कोणाच्या हातावर पिंड द्यावा?



राजा मागे फिरला. जंगलात जाऊन त्याने ते प्रेत पुन्हा खांद्यावर घेतले. तेव्हा वेताळ म्हणाला, "राजा तू खरोखर कष्टाळु आहेस. तुझ्या श्रमाचा तुला विसर पडावा म्हणून एक गोष्ट सांगतो ऐक—"

अचलागढ येथे राज्य करणाऱ्या राजा जयसिंहाला फक्त एकच दुःख होते. सर्व सुखे पायाशी लोळण घेत होती; परंतु त्याला अपत्य नसल्याने तो फार दुःखी होता. राजा राणीने खूप उपाय केले. नवससायास केले, यज्ञयाग केले; पण काहीही उपयोग झाला नाही.

अचलागढपासून थोड्या दूर अंतरावर उदयपूर येथे धनपाल नावाचा एक श्रीमंत व्यापारी होता. त्याच्या मुलीचे नाव होते मोहिनी. मोहिनी पंधरा वर्षांची झाली. आणि धनपाल एकाएकी मरण पावला. आपले आप्त आता आपल्याला लुबाडतील असे वाटून मोहिनीची आई फार घाबरली. तिने जवळचा सर्व पैसा अडका गोळा केला व रातोरात ती दुसऱ्या गावाला जायला निघाली.

रात्र अंधारी होती. सभोवतालचे काही दिसत नव्हते. त्यामुळे ती फार घाबरली होती; पण तशीच नेटाने पुढे जात होती. वाटेत तिचा कुणालातरी धक्का लागला. त्याबरोबर कुणीतरी आर्त स्वरात म्हणाले, "मला सुळावर चढवले आहे. मी थोड्या वेळचा सोबती आहे. तरीही माझ्या दुःखात कोण भर घालते आहे?"

"तू कोण आहेस?" तिने विचारले.

"मी एक चोर आहे. शिक्षा म्हणून मला सुळावर चढवले आहे; परंतु माझा प्राण जात नाही. तू कोण आहेस ?"

मोहिनीच्या आईने चोराला आपली हकीकत सांगितली. तेवढ्यात चंद्रोदय झाला. मरणोन्मुख चोराने मोहिनीलाही पाहिले. तो म्हणाला, "बाई, मी तुला दहा हजार मोहरा देतो. माझ्याबरोबर तुझ्या या मुलीचे लग्न लावून दे."

"लग्न ? कशाकरता ?"

"मी निपुत्रिक मेलो तर मला गती मिळणार नाही."

"पण तिला पुत्र होईलच कसा ?"

"मी मेलो तरी एखादा सच्छिल ब्राह्मण ठेव. म्हणजे हिला पुत्र होईल. त्या सावत्र मुलामुळे मला सद्गती मिळेल."

पैशाच्या लोभाने मोहिनीच्या आईने ते कबूल केले. कन्यादानाचा संकल्प म्हणून तिने ते पाणी चोराचे हातावर सोडले. तेव्हा तो म्हणाला, "बाई, त्या वडाचे झाडाखाली मोहरा आहेत त्या घे व जा; परंतु माझे सर्व विधी व्यवस्थित करा."

एवढे सांगून चोराने प्राण सोडले. त्याचे सारे विधी यथासांग करून मोहिनीची आई अचलागढ येथे मुलीसह राहू लागली. त्यांच्या शेजारीच एक तरुण ब्राह्मण रहात होता. त्याचा व मोहिनीचा परिचय झाला. परिचयातून प्रेम जडले आणि त्यातच तिला दिवस राहिले. मोहिनी व तिची आई फार घाबरली.

त्याच रात्री मोहिनोला एक स्वप्न पडले.

"होणाऱ्या बालकाचा नाश करू नकोस. त्याला जन्मल्याबरोबर लगेच राजाच्या दरबारात ठेव. त्याच्या उशापाशी हजार मोहरांची थैली ठेव." असे स्वतः शंकरांनी तिला सांगितले.

मुलीने हे स्वप्न आईला सांगितले. आई शंकरभक्त होती. त्यामुळे तिने असेच वागावयाचे ठरविले. नऊ मास पूर्ण भरताच मोहिनीने एका सुंदर

बालकाला जन्म दिला. भल्या पहाटे तिने ते बालक उचलले व राजाच्या दरबारात नेऊन ठेवले.

इकडे राजालाही रात्री असेच एक स्वप्न पडले. "राजा, उठ. तुझ्या दाराशी भाग्य चालून आले आहे. त्या मुलाला स्वतःचा पुत्र मान म्हणजे तुझे कल्याण होईल. मुलाच्या उशाशी तुला हजार मोहरा सापडतील." स्वप्नातून जागा झालेला राजा ताडकन् उठला व स्वतः दरवाजा उघडून बाहेर बघू लागला.

एक नवजात अर्भक खरोखर रडत होते. राजाने त्याला उचलून घेतले. त्याच्या उशाशी हजार मोहरा होत्या. राजाने परमेश्वराचे आभार मानले. "माझे गाऱ्हाणे ऐकलेस, मला हवा तसा मुलगा दिलास." असे म्हणत तो देवाची स्तुती करू लागला.



राजा ताडकन् उठला व स्वतः दरवाजा उघडून बाहेर बघू लागला.

राजधानीत पुत्रोत्सव साजरा करायचे हुकूम सुटले. सारी राजधानी आनंदात न्हाऊन निघाली, हळुहळू ते बालक मोठे होऊ लागले. मुलाला शिकवण्यासाठी निरनिराळे शिक्षक ठेवले. राजपुत्र सर्व विद्यांत पारंगत होऊ लागला. राजपुत्र चंद्रकांत सर्वांना फार आवडू लागला.

चंद्रकांत सज्ञान होताच राजाने त्याला गादीवर बसवले व स्वतः निवृत्त झाला. काही वर्षे गेली. वृद्धापकाळामुळे तो राजा मरण पावला. सर्वांना अतिशय दुःख झाले. राजपुत्र तर दुःखाने वेडापिसा झाला.

काही दिवस गेल्यावर एकदा राजपुत्र प्रधानाला म्हणाला, "राजाने माझ्यावर जे अगणित उपकार केले आहेत त्याचे ऋण जन्मोजन्मी फिटणार नाही; परंतु आता त्यांच्या अस्थी गंगेत नेऊन टाकीन म्हणतो. निदान त्यांची तेवढी तरी सेवा घडू दे."

सर्वांनीच या सुचनेचे आनंदाने स्वागत केले. काही निवडक लोक बरोबर घेऊन राजपुत्र यात्रेला निघाला. नाना प्रकारच्या अरण्यांतून मार्ग काढत तो जान्हवीच्या काठावर आला. त्या पवित्र नदीला वंदन करून तो खाली उतरला. तेथे स्नानसंध्या, दानधर्म वगैरे सर्व केले. वडिलांचे श्राद्ध केले आणि तो काशीला पोहोचला.

काशीनगरात गेल्यावर त्याने उपवास केला. गंगेत स्नान केले, शंकराची पूजा केली व गयेला गेला.

गया कुपात पित्याला पिंड देऊ लागताच तीन हात वर आले. ते पाहाताच तो फार घाबरला. त्याने ब्राह्मणांना विचारले, "मी आता कोणत्या हातावर पिंड देऊ?"

तेथल्या विद्वान ब्राह्मणाने राजपुत्राला सांगितले, "महाराज, ज्या हातावर लोखंडी खिळ्याची खूण आहे तो एक चोराचा हात आहे. ज्या हातावर पत्रिका आहे तो एक ब्राह्मणाचा हात आहे व ज्या हातावर रेखांकित सुलक्षणे आहेत तो राजाचा हात आहे; पण या हातापैकी कोणत्या हातावर पिंड द्यावे ते आम्हांलाही कळत नाही! हा काय चमत्कार आहे कोण जाणे?"

ब्राह्मणाचे उत्तर ऐकून राजपुत्र चंद्रकांतही आश्चर्यचकित झाला.

एवढी कथा सांगून वेताळ म्हणाला, "विक्रमा, तू सांग बरे, राजपुत्राने कोणाच्या हातावर पिंड द्यावा?"

तेव्हा राजा विक्रम म्हणाला, "वेताळा, राजपुत्र चंद्रकांतने चोराच्या हातावर पिंड देणे योग्य ठरेल. धर्मशास्त्राप्रमाणे तो चंद्रकांत चोराचाच मुलगा. ब्राह्मण जरी त्याचा जन्मदाता बाप असला तरी मोहिनीशी त्याचे विधीपूर्वक लग्न झालेले नव्हते. राजाने त्याला वाढविले, जोपासले तेव्हा तो त्याचा मुलगा ठरला असता; परंतु पण राजाने त्या बालकाजवळ असलेल्या १००० मोहरा त्याला वाढवण्याची किंमत म्हणून घेतल्या होत्या. त्यामुळे राजाचा हक्क राहात नाही, तेव्हा चंद्रकांतने चोराचे हातावर पिंड देणे योग्य होईल."

विक्रमाचे हे उत्तर ऐकताच वेताळ त्याच्या खांद्यावरून उडाला व झाडावर लोंबकळू लागला.

* * *



## कथा बारावी

# हत्त्या कोणी केली?

राजा विक्रम पुन्हा जंगलात गेला. ते प्रेत आपल्या खांद्यावर घेतले व तो चालू लागला. तेव्हा वेताळ म्हणाला, "राजा, काय हा तुझा हट्ट? अरे, तू राजवाड्यात आराम कर. मलाही आराम करू दे; पण तू ऐकणार नाहीस! बरं जाऊ दे. मी तुला आणखी एक कथा सांगतो ऐक."

चुडापूर येथे चुडामणी राजा राज्य करत होता. त्याच्या गुरूला एकुलता एक मुलगा असून त्याचे नाव हरिहर असे होते. हरिहराच्या पत्नीचे नाव होते मृणालिनी. मृणालिनी खरोखरच अनुपम लावण्यवती होती. हरिहराचे आपल्या पत्नीवर अतिशय प्रेम असून तिच्याशिवाय त्याला क्षणंभरही चैन पडत नसे.

वैशाख महिना चालू होता. उन्हाळा प्रखर असल्याने रात्री हरिहर आपल्या पत्नीसह घराच्या गच्चीवर झोपला होता. बराच वेळ प्रणयक्रीडा केल्यावर मध्यरात्री दोघांनाही गाढ झोप लागली. एक गंधर्व त्याच वेळी विमानाने आकाशातून जात होता. त्याने मृणालिनीचा कमनीय देह व तिचे लावण्य पाहिले. चंद्रप्रकाशात ती एखाद्या हिऱ्याप्रमाणे चमचम करत होती. ही स्त्री आपल्याला हवीच असे मनाशी ठरवून तो खाली उतरला.

निद्रिस्त मृणालिनीला त्याने हळुवार हाताने खांद्यावर घेतले व परत आकाशमार्गाने तो निघून गेला. थोड्या वेळाने हरिहर जागा झाला. पहातो तो शेजारी पत्नी नाही. त्याने सर्वांना उठवले. सगळीकडे शोध केला; पण तिचा पत्ता लागेना. काही दिवस गेले, तेव्हा वैतागून त्याने संसाराचा त्याग केला व अंगाला राख फासून तो काशीला जायला निघाला.

जाता जाता एक दिवस दुपारी भुकेने व्याकुळ होऊन तो एका घरासमोर थांबला. ते घर एका ब्राह्मणाचे होते. दारात एक भुकेला गोसावी उभा आहे, हे पाहाताच ब्राह्मणाला दया आली. पत्नीला सांगून त्याने त्याला जेवायला वाढले.

हरिहराने आपले ताट उचलले. शेजारच्या वडाखाली ताट ठेवून तो विहिरीवर हातपाय धुवायला गेला. त्यावेळी एक गरूड पक्षी झाडावर बसला होता. गरूड पक्ष्याने नागाचा लचका तोडताच अगतिक झालेल्या नागाच्या तोंडातून विष बाहेर पडले, ते नेमके त्या ताटात पडले.

हात पाय धुऊन हरिहर झाडाखाली आला व जेवायला बसला. पोटात विषयुक्त अन्न गेल्याने त्याला कसेसेच होऊ लागले. तो त्या ब्राह्मणाकडे

आला व म्हणाला, "अहो, तुमच्याकडील अन्नात विष पडले असावे. कारण ते अन्न खाताच मला कसेतरी वाटू लागले आहे."

एवढे बोलून हरिहर तेथेच बेशुद्ध पडला व थोड्या वेळाने मरण पावला. हे पाहाताच त्या ब्राह्मण पती-पत्नीला फार वाईट वाटले.

एवढी कथा सांगून वेताळ म्हणाला, "विक्रमा, हरिहराची हत्या कोणी केली ते तूच सांग! सपनि, गरूडाने का त्या ब्राह्मण स्त्रीने?"

"वेताळा," विक्रम म्हणाला, "सर्पाचा काही अपराध नव्हता. शत्रूच्या हाती असल्याने तो सर्वस्वी पराधीन होता. गरूडाचाही काही अपराध नाही. कारण तो स्वतःचे भक्ष्यच खात होता. आणि ब्राह्मण स्त्रीने तर दानधर्म केला होता. तेव्हा त्या तिघांपैकी कोणीच अपराधी नाही; परंतु अविचाराने यांपैकी कुणाच्यातरी डोक्यावर हत्त्येचे खापर फोडण्याचा जो कोणी प्रयत्न करील त्याच्याच डोक्यावर ती हत्त्या लादली जाईल." हे ऐकताच वेताळ विक्रमाचे खांद्यावरून उडाला व झाडावर जाऊन बसला.

## कथा तेरावी

# अधिक त्यागी कोण?



विक्रम पुन्हा माघारी वळला व जंगलात जाऊन झाडावरील प्रेताला आपल्या खांद्यावर घेऊन परत चालू लागला.

तेव्हा वेताळ म्हणाला, "विक्रमा, तू फार दमला आहेस? थोडी विश्रांती तरी घे. नाही पेक्षा मी तुला आणखी एक गोष्ट सांगतो ऐक–"

चंदनपुरात हिरण्यनाथ म्हणून एक व्यापारी रहात होता. त्याची कन्या मदालसा ही फारच सुंदर होती. एके दिवशी ती सार्वजनिक उद्यानात फिरायला गेली असताना देवदत्त नावाचा एक तरुण तेथे आला. त्याने या मुलीला पाहिले व त्याचे मन तिच्यावर बसले. आपल्याला हीच स्त्री हवी असे मनाशी ठरवून तो पुढे आला.

आजुबाजूला कोणी नाही अशी संधी साधून त्याने तिचा हात धरला आणि "माझ्या, प्रीतीचा स्वीकार कर." असे सांगू लागला.

हा प्रकार पाहून मदालसा गोंधळून गेली. तो हात सोडीना तेव्हा ती म्हणाली, "अरे तू असे काय करतोस? माझा विवाह समुद्रगुप्ताबरोबर आधीच ठरलेला आहे. तू असा वेडेपणा करू नकोस. मला घरी जाऊ दे."

पण तो देवदत्त स्वतःहून जायलाही तयार होईना व तिचा हातही सोडीना. मदालसा आता मात्र घाबरली. हा आता येथेच काही कमीजास्त प्रकार करील व अब्रू जाईल या भीतीने ती त्याला म्हणाली, "हे बघ! आता माझा हात सोड. माझा विवाह झाला, की लगेच एकदा मी तुला भेटेन व तुझे मनोरथ आधी पूर्ण करीन!"

तिच्या वचनाने शांत होऊन तो देववत्त माघारी निघून गेला. आजचे मरण उद्यावर ढकलून मदालसा घरी परतली. नंतर ठरलेल्या मुहूर्तावर मदालसेचा विवाह मोठ्या थाटामाटाने झाला. सर्व विवाहविधी होऊन तिने गृहप्रवेश केला. रात्री सुसज्ज अशा रंगमहालात दोघे पती-पत्नी एकत्र आली. त्यावेळी मदालसेला आपण दिलेल्या वचनाची आठवण झाली व ती रडू लागली.

पतीने तिला रडण्याचे कारण विचारताच तिने त्याला सर्व हकीकत सांगितली. खिन्न मनाने पतीने सांगितले."जा त्याला भेटून परत ये."

मदालसा उठली व देवदत्ताला भेटण्यासाठी निघाली. आधीच ती सुंदर, त्यात विवाहाच्या पहिल्या रात्रीचा वधूवेष, त्यामुळे ती नितांत सुंदर दिसत होती. रात्रीची वेळ होती. वचन पूर्ण करण्याकरता मदालसा न घाबरता

चालली होती; पण काय झाले ? अर्ध्याच वाटेवर एका चोराने तिला अडवले व " तू माझी हो. " असे तो म्हणू लागला. आता हा आपल्याला सोडत नाही असे पाहाताच तिने चोराला आपली सर्व हकीकत सांगितली.

" देवदत्ताकडून परत येताना तुझे मनोरथ पूर्ण करीन. " असे तिने आश्वासन दिले व ती देवदत्ताकडे गेली.

देवदत्ताची पर्णकुटी गावापासून एकांतात दूर होती. वधूवेषातील मदालसा वचन दिल्याप्रमाणे आपल्याकडे आली आहे हे पाहाताच देवदत्ताचे मनातील विकार नाहीसे झाले. त्याच्या मनाला शरम वाटली. तिच्याविषयी आदर वाढला. ती पर्णकुटीत येताच त्याने तिला बसावयास आसन दिले व सर्व हकीकत विचारली.



देवदत्त अश्रू गाळत म्हणाला, " ताई, तुझ्या वेड्या भावाला क्षमा कर....

नंतर अश्रू ढाळत म्हणाला, "ताई, तुझ्या वेड्या भावाला क्षमा कर. मी त्यावेळी मूर्खपणा केला. आता मला पश्चात्ताप होत आहे. मी तुझा लहान भाऊ आहे. आता तू निःशंक मनाने पतीगृही जा."

आनंदलेली मदालसा परत घरी जावयास निघाली. वाटेत तिला त्या चोराचे स्मरण झाले. तो अजून रस्त्यातच उभा होता. तिला आलेली पाहाताच त्याने आश्चर्याने विचारले, "काय? इतक्या लवकर परत आलीस?"

मदालसेने घडलेली हकीकत मोठ्या आनंदाने त्या चोराला सांगितली. ती हकीकत ऐकून चोराचे मनही पालटले. तो म्हणाला, "सुंदरी, असे आहे तर मीही तुझा दुसरा भाऊच आहे, असे समज! तू शांत मनाने व निष्कलंक शरीराने घरी जा. मी तुला सोबत करतो." असे म्हणून चोराने तिला घराजवळ आणून सोडले.

मदालसा आपल्या शयनगृहात शिरली. मोठ्या आनंदाने तिने सारी हकीकत पतीला सांगितली. आपली पत्नी निष्कलंक आहे, हे पाहाताच समुद्रगुप्ताने तिला मोठ्या प्रेमाने जवळ घेतले.

एवढी कथा सांगून वेताळ म्हणाल, "राजा, आता मला सांग चोर, देवदत्त व मदालसेचा पती समुद्रगुप्त या तिघांत अधिक त्यागी कोण?"

"वेताळा," विक्रम म्हणाला, "त्या तिघात तो चोरच अधिक त्यागी आहे. चंद्रगुप्ताने विवाहाच्या पहिल्या रात्री आपल्या पत्नीला जाण्याची परवानगी दिली हे खरे; पण त्याचे असे आहे, आपली पत्नी मनाने का होईना दुसऱ्याची आहे, हे कळल्यावर कोणता पुरुष त्या स्त्रीचा लोभ धरील?

"बरं, देवदत्ताने तिला बहीण मानले. कारण मागच्या गोष्टीला आता बराच काळ लोटला होता. त्या काळात त्याची तिच्याविषयीची आसक्ती कमी झाली होती. तो मोहाचा क्षण आता मागे पडला होता. शिवाय त्याला आता अब्रूची काळजी होती. मदालसेची हकीकत तिच्या पतीने जर

राजाच्या कानावर घातली तर आपली बेअब्रू तर होईलच. शिवाय कडक शिक्षाही होईल. तेव्हा ते सर्व टाळण्यासाठी त्याने स्वतःकडे मोठेपणा घेऊन तिला परत पाठवून दिले; पण चोराचे मात्र तसे नव्हते. बोलून चालून तो चोरच होता. गुप्तपणे काम करणारा होता. अपकीर्तीबद्दल तो बेफिकीर होता. त्याला सत्याची चाड नव्हती. तो पाप करणारा साहसी तरुण होता. तेव्हा हाती लागलेली मदालसेसारखी सुंदर तरुणी परत करण्यात त्याने सर्वात त्याग केला आहे, हे निश्चित आहे.''

विक्रमाचे उत्तर ऐकताच वेताळ त्याचे खांद्यावरून उडाला व झाडावर लोंबकळू लागला.

ॐ ॐ ॐ



## कथा चौदावी

# चोर का हसला?

लगेच विक्रम परत फिरला. जंगलात जाऊन त्याने वेताळाला पुन्हा खांद्यावर घेतले. तेव्हा वेताळ म्हणाला, ''हे साहसी महापुरुषा, तू खरोखरच धन्य आहेस. तुझा प्रवास कंटाळवाणा होऊ नये म्हणून मी तुला आणखी एक कथा सांगतो ऐक-''

उदयपूर नगरीत एक श्रीमंत व्यापारी रहात होता. त्याला एकुलती एक मुलगी होती. तिचे नाव होते रत्नमाला. ती फार सुंदर व हुशार होती; परंतु तिच्यात एकच दुर्गुण होता.

ती फारच हट्टी होती. लहानपणापासून बापाने तिचा एक शब्दही खाली पडू दिला नव्हता.

रत्नमाला आता उपवर झाली होती. तिच्या लावण्याच्या कीर्तीने तिला निरनिराळ्या ठिकाणाहून मोठमोठ्या लोकांच्या मागण्या आल्या होत्या. काही देशांच्या राजपुत्रांनीही तिला मागणी घातली; पण तिने प्रत्येकास नकार दिला.

"माझे मन ज्या तरुणावर बसेल त्याच्याशीच मी लग्न करीन. नाहीतर अविवाहित राहीन." असे तिने बापाला निक्षून सांगितले. त्यामुळे बापाचा नाइलाज झाला.

याच सुमारास उदयपूर नगरात फार चोऱ्या होऊ लागल्या. राजाच्या गुप्तहेरांना, चतुर शिपायांना कोणालाच चोराचा तपास लावता येईना. शेवटी कंटाळून लोक राजाकडे गेले व म्हणाले, "महाराज, आपण जर चोराचा बंदोबस्त करू शकत नसाल तर आम्हांला उदयपूर सोडून निघून जावे लागेल."

राजाने स्वतः चोराला पकडण्याचे आश्वासन दिले. तेव्हा लोक शांतपणे परत गेले. आता राजा रोज रात्री वेष पालटून शहरात हिंडू लागला. फिरता फिरता राजाला चोर आढळला. राजा लपत छपत त्याचे मागून जाऊ लागला.

थोड्या वेळाने, पुढच्या माणसाने राजाला विचारले, "काय रे ? तू कोण आहेस ?"

"मी एक चोर आहे." राजाने उत्तर दिले.

"मग चल माझ्याबरोबर." असे म्हणून तो चोर एका घरात शिरला. दोघांनी मिळून चोरी केली. चोरीचा माल घेऊन दोघेजण एक पडक्या वाड्यात आले. बाहेरून पडका असला तरी आत बऱ्याच सोई केलेल्या होत्या. तेथे अमाप संपत्ती दिसत होती. चोर काही कामासाठी आपल्या खोलीत शिरला. आता हा आपल्याला जिवंत ठेवणार नाही. कारण आपल्याला याचे रहस्य समजले आहे, असे वाटून राजा तिथून निघाला. तो एकदम राजवाड्यात आला.

दुसरे दिवशी राजाने त्या पडक्या वाड्याला वेढा घालण्याचा हुकूम दिला. तो चोर राजाच्या जाळयात सापडला. त्याच्या तळघरात राजाच्या खजिन्याएवढी संपत्ती सापडली. राजाने ती संपत्ती ज्याची त्याला परत करण्याचे ठरविले व चोराला फाशीची शिक्षा ठोठावली.

राजाचे शिपाई त्या चोराला वधस्तंभाकडे घेऊन चालले होते. रत्नमाला आपल्या गवाक्षातून रस्त्यावर पाहात होती. तिच्या नजरेला त्याचे सुंदर रूप, पिळदार शरीर, उन्नत मान, अंगावर जखमा झालेल्या असूनही बेफिकीर वृत्ती हे सारे नजरेस पडले. ती त्याच्यावर मोहीत झाली.


याच तरुणाशी लग्न करायचे असे ठरवून ती वडिलांना म्हणाली, "बाबा, मी याच तरुणाशी लग्न करणार. तुम्ही आत्ताचे आता महाराजांकडे जा आणि त्याच्याबद्दल रदबदली करा; त्याचा दंड भरा. काय वाटेल ते करा; पण त्याला सोडवा."

बिचारा व्यापारी! मुलीच्या हट्टामुळे नाईलाजाने राजाकडे गेला. त्या चोराच्या वजनाइतके सोने द्यावयाचेही त्याने कबूल केले. खूप रदबदली केली; पण राजाने ऐकले नाही. शेवटी खिन्न मनाने तो घरी आला व त्याने सर्व हकीकत लेकीला सांगितली.

रत्नमाला म्हणाली, "बाबा, त्या अज्ञात तरुणाला मी मनाने वरलेच आहे. तो फाशी गेला, की मी त्याच्याबरोबर सती जाईन!"

एव्हाना रत्नमालेची ही हकीकत शहरात सर्वांना कळली होती. फासावर जाणाऱ्या चोरालाही ती कळली. सुळावर चढलेल्या त्या चोराने ती गोष्ट ऐकली. त्याच्या डोळ्यांतून दोन अश्रू खाली ओघळले व मग तो चमत्कारिकपणे हसला. थोड्याच वेळाने त्याचे प्राणोत्क्रमण झाले.

त्याची चिता रचून रत्नमालेने सती जाण्याची तयारी केली. सर्वांना नमस्कार करून ती चितेवर चढणार तोच भगवान शंकर आकाशातून तिला म्हणाले, "मुली, हा तरुण जरी चोर असला तरी तुझ्या एकनिष्ठ प्रेमाने, त्याच्यावरील निष्ठेने मी प्रसन्न झालो आहे. काय हवा तो वर माग!"



....आणि चितेवर पडलेला तो चोर उठून बसला.

"भगवान, माझा पती जिवंत होवो व धर्माचरणाने वागो, हाच मला वर द्या!" रत्नमाला म्हणाली. "तथास्तु!" असा गंभीर आवाज आला आणि चितेवर पडलेला तो चोर उठून बसला. आता देवाच्या आशीर्वादाने तो सद्‌गुणी बनला होता. राजाने त्याचे मागचे सर्व अपराध माफ करून त्याला आपल्या पदरी ठेवून घेतले. मग त्याचे व रत्नमालेचे लग्न अतिशय थाटामाटाने झाले.

इतकी कथा सांगून वेताळ विक्रमाला म्हणाला, "विक्रमा, तो फाशी गेलेला चोर प्रथम क्षणभर रडला आणि नंतर हसला, तो का?"

तेव्हा विक्रमाने उत्तर दिले, "वेताळा, काहीही संबंध नसताना आपल्यावर उपकार करणाऱ्या त्या व्यापाऱ्याच्या ऋणातून आपण मुक्त होऊ शकणार नाही, म्हणून त्याला वाईट वाटले व तो क्षणभर रडला. राजपुत्रांना

नाकारून आपल्यासारख्या एका चोरावर रत्नमाला प्रेम करू लागलेली पाहून तो आश्चर्यचकित झाला व चमत्कारिकपणे हसला. ''

विक्रमाचे उत्तर ऐकताच वेताळ त्याचे खांद्यावरून उडाला व झाडावर लोंबकळू लागला.



## कथा पंधरावी

# अपराधी कोण ?

राजा विक्रम न कंटाळता पुन्हा मागे फिरला. त्याने ते प्रेत काढून खांद्यावर घेतले व तो चालू लागला. तेव्हा प्रेतातला वेताळ राजाला म्हणाला, '' राजा, तुला मी आणखी एक कथा सांगतो. ऐक— ''

फार पूर्वी मिलिंदपूर येथे राजा विद्याधर राज्य करत होता. त्याच्या राज्यात महादेवशास्त्री म्हणून एक ब्राह्मण राहत होता. त्याला चार मुलगे होते. विद्याभ्यास करण्यासाठी चौघेजण परदेशी गेले. शिक्षणक्रम संपवून ते घरी आले. थोड्या आजाराचे निमित्त होऊन महादेवशास्त्री मरण पावला. त्याची साध्वी पत्नी त्याच्याबरोबर सती गेली.

या व्यवहारशून्य पंडितांना त्याच्या भाऊबंदांनी पार लुबाडले. घरात खाण्याची पंचाईत झाल्यामुळे ते आपल्या मामाकडे जाऊन पोहोचले. या कफल्लक भाच्यांना मामांकडे कोणी नीट वागवेना. सर्वजण त्यांच्याकडे आश्रित म्हणून पाहात असत. त्यांचा पदोपदी अपमान करत. त्यामुळे कंटाळून गेलेला मोठा भाऊ आपल्या तीन भावांना म्हणाला, '' बंधुंनो, असे

लाजिरवाणे जिणे जगण्यापेक्षा आपण सर्वांनी सरळ आत्महत्त्या करावी असे माझे मत आहे. ''

तेव्हा दुसरा भाऊ म्हणाला, '' दादा, तू हुशार आहेस. शहाणा आहेस, तरी असे कसे बोलतोस ? संपत्ती कधी एकाच घरी रहाते का ? त्या चंचल लक्ष्मीसाठी इतके निराश होणे योग्य नाही. तेव्हा आपण असे काहीतरी करू या, की त्यामुळे आपले नाव अजरामर होईल. ''

दुसऱ्या भावाचे बोलणे सर्वांना पटले. मग पुष्कळ विचार करून त्यांनी ठरवले, की प्रत्येकाने निरनिराळ्या वाटेने दूर जावयाचे. परिश्रमाने एखादी अलौकिक विद्या संपादन करावयाची. सहा महिन्यांनी परत ठरलेल्या ठिकाणी सर्वांनी जमायचे. झाले ! त्यांनी एकमेकांचा निरोप घेतला व ते चार वाटांनी निघून गेले.

सहा महिने भराभर निघून गेले. ठरलेल्या दिवशी चौघेजण याच ठिकाणी जमले. थोरल्या भावाने कोणतेही हाड मिळाल्यास त्यावर मांस उत्पन्न करण्याची विद्या मिळविली होती.

दुसऱ्याने हाड व मांस असेल तर त्यावर योग्य ते कातडे पैदा करण्याचे ज्ञान मिळविले होते. तिसऱ्याने हाडे, मांस व कातडी असल्यानंतर अवयव निर्माण करावयाचे ज्ञान पैदा केले होते. चौथ्याने त्यात प्राण फुंकण्याचे कसब आत्मसात केले होते. चौघांनी आपापल्या विद्येची माहिती परस्परांना सांगितली. आपल्याला कला कितपत साध्य झाली आहे, याचा अंदाज घेण्यासाठी ते एका जंगलात शिरले.

एका ठिकाणी काही हाडे पडली होती. प्रथम मोठा भाऊ पुढे झाला. त्याने त्या हाडांवर मांस निर्माण केले. दुसऱ्याने त्यावर कातडे निर्माण केले. नंतर तिसरा भाऊ पुढे झाला. त्याने त्या प्राण्याचे इतर सर्व अवयव निर्माण केले. सिंहाची भव्य आकृती चौघांसमोर उभी राहिली होती. तिघांची विद्या परिपूर्ण झालेली आहे, असे सिद्ध झाले. चौथ्याने समोर सिंह उभा आहे हे लक्षात न घेता त्या आकृतीत प्राण ओतला.

प्राण आल्याबरोबर तो सिंह जिवंत झाला व त्याने त्या चौघा भावांना खाऊन टाकले.

एवढे सांगून वेताळ विचारले, "विक्रमा, या चौघा भावांत अपराधी कोण?"

विक्रम म्हणाला, "वेताळा, तो चौथा भाऊ खरा अपराधी आहे. कारण त्याने त्या मृतदेहात प्राण ओतला. इतर तिघांना मांस, कातडी व अवयव तयार होईपर्यंत हा प्राणी कोण आहे, याची कल्पना नव्हती; परंतु चौथ्याचे तसे नव्हते. त्याला सिंह उभा आहे हे दिसत होते. त्याने त्या सिंहाच्या शरीरात प्राण ओतायला नको होता. तेव्हा या चौघांच्या मृत्यूची जबाबदारी त्या चौथ्याची."

विक्रमाचे हे उत्तर ऐकताच वेताळ परत जंगलातील झाडावर जाऊन लोंबकळू लागला.



## कथा सोळावी

# अधिक चतुर कोण?

राजा विक्रमाने परत वेताळाला झाडावरून खाली काढले व खांद्यावर टाकून तो चालू लागला. तेव्हा वेताळ त्याला म्हणाला, "हे राजा, तू खरंच दुराग्रही आहेस. तरी पण तुझी करमणूक व्हावी म्हणून मी तुला आणखी एक कथा सांगतो ऐक –"

बंगालमध्ये कालिपूर येथे हरेश्वर नावाचा ब्राह्मण रहात होता. त्याला तीन मुलगे होते. हरेश्वराला काही यज्ञविधीसाठी एक

कासव हवे होते. म्हणून त्याने तिघा मुलांना कासव आणण्यासाठी पाठवले. पाणवठ्यावर गेल्यानंतर त्यांना एक कासव दिसले. मोठा मुलाने "त्या बिळबिळीत मऊमऊ अंगाला हात लावायला मला आवडत नाही," असे सांगितले. दुसऱ्या दोघांनीही हात लावायचे नाकारले. तिन्ही मुलांनी कासवाची ही हकीकत वडिलांना सांगितली. वडिलांनाही राग आला. त्यांनी हा तंटा राजाकडे नेला.

तिन्ही भाऊ राजाला म्हणाले, "महाराज, आम्ही आपापल्या विद्यांत पारंगत आहोत; परंतु त्या बिळबिळीत कासवाला हात लावायला आम्हांला आवडत नाही."

"असं? तुम्हांला काय काम येते?" राजाने विचारले.

सर्वात मोठा भाऊ म्हणाला, "मी भोजनप्रवीण आहे."

दुसरा म्हणाला, "मी वासप्रवीण आहे."

तिसरा म्हणाला, "मी शय्याप्रवीण आहे."

"बरं, मी तुम्हां तिघांची परीक्षा घेतो. जर नापास झालात, तर प्रत्येकाला दोन-दोन कासवे हातात धरून आणावी लागतील. परीक्षा होईपर्यंत तुम्ही येथे राजवाड्यातच राहावयाचे." राजा म्हणाला.

"कबूल, एकदम कबूल" तिघांनी एकदम उत्तर दिले.

एक दिवस दुपारी जेवणासाठी राजाच्या पंगतीला हे तिन्ही भाऊ बसले होते. सर्वांच्या पानात राजेशाही पदार्थ वाढलेले होते. सर्वजण जेवावयास बसले; पण मोठा भाऊ भोजनकुशल होता, तो पानाला हात लावेना.

राजाने विचारले, "काय रे, काय झाले? जेवत का नाहीस?"

"महाराज, या भाताला स्मशानातील धुराचा वास येतो आहे, म्हणून तो मला चालणार नाही."

राजाने व इतर सर्वांनी भाताचा वास घेऊन पाहिला; पण कुणालाही कसलाच वास आला नाही. शेवटी तो तांदूळ कोठून आणला आहे, याची राजाने चौकशी केली. त्या तांदळाचे शेत खरोखरच स्मशानाजवळ होते.

आश्चर्यचकित झालेल्या राजाने त्या ब्राह्मणास 'भोजनकुशल' ही पदवी दिली. बरेच द्रव्य दिले व घरी पाठवून दिले.

रात्री खास दासींपैकी जी सर्वात सुंदर दासी होती तिला राजाने मधल्या भावाच्या शयनगृहात पाठवले. ती सुवासिक तेले, अत्तरे, चंदनाचा लेप वगैरे सर्व तऱ्हेचा साजशृंगार करून गेली होती. त्याचप्रमाणे तिने गळ्यात, हातात सुवासिक गजरे बांधले होते.

तिने शयनमंदिरात प्रवेश करताच तो मधला भाऊ म्हणाला, "शी, शी! काय ही स्त्री! हिच्या अंगाला बकऱ्याची दुर्गंधी येते आहे. हिला अगोदर बाहेर काढा."

त्याच्या या बोलण्याने त्या दासीचे तोंड खर्रकन उतरले. ती तशीच राजाकडे गेली. राजाने तिची सर्व हकीकत ऐकून घेतली व म्हटले, "अरे, हिने सर्वांगाला केशर, कस्तुरी लावली आहे आणि तुला बकऱ्याचा घाणेरडा वास येतो म्हणजे आश्चर्य आहे."

तेव्हा हात जोडून नम्रपणे तो ब्राह्मण म्हणाला, "सरकार, मला वास येतो तो खरा आहे. आपण पाहिजे तर चौकशी करा!"

राजाने बारकाईने चौकशी केली. तेव्हा त्याला कळले, 'या दासीची आई तिला जन्म देताच मरण पावली. त्यामुळे तिच्या आजीने तिला बकरीच्या दुधावरच वाढविले होते.'

राजाने या दुसऱ्या ब्राह्मणाला 'वासचतुर' अशी पदवी दिली. मोठी दक्षिणा दिली व घरी पाठवून दिले.

आता तिसऱ्या भावाची परीक्षा राहिली होती. एक दिवस राजाने खास पलंगावर एकावर एक अशा सात मुलायम गाद्या घालावयास सांगितल्या. यावर त्या धाकट्या भावास झोपावयास सांगितले. एक तासभर झोपल्यानंतर तो 'हाय, हाय' करत उजव्या बाजूला चोळत उठून बसला. सेवकांनी पाहिले. त्याच्या उजव्या कुशीवर केसाचा खोल वळ उमटला होता. त्यांनी ही गोष्ट राजाला कळविली. राजाने सेवकांना गाद्या तपासण्याचा



गाद्या तपासल्या तेव्हा सातव्या गादीखाली त्यांना एक केस सापडला.

हुकूम दिला. सेवकांनी गाद्या तपासल्या तेव्हा सातव्या गादीखाली त्यांना एक केस सापडला.

राजाला फार आश्चर्य वाटले. त्याने त्या मुलाला 'शय्याचतुर' पदवी देऊन दक्षिणाही दिली. तिघांना आपल्याकडे नोकरीला ठेवून घेतले. त्याच्या वडिलांना राजाने एक कासव बक्षीस दिले.

एवढी गोष्ट सांगून वेताळ म्हणाला, "राजा, या तीन भावात अधिक चतुर कोण?"

"सर्वात धाकटा भाऊ!" विक्रमाने चटकन उत्तर दिले. तो पुढे म्हणाला, "वेताळा, त्या लहान भावाचे उजवे कुशीवर त्या केसाचा वळ उमटला होता. तो सर्वांनी पाहिलाही होता. पहिल्या व दुसऱ्या भावाला

तांवळाची किंवा दासीची माहिती कुणाकडून तरी काढून घेता आली असती म्हणजे संशयाला जागा आहे; परंतु धाकट्याचे बाबतीत प्रत्यक्ष पुरावा आहे."

विक्रमाचे मौन भंग होताच वेताळ त्याच्या खांद्यावरून उडाला व थेट जंगलातील झाडावर जाऊन बसला.



## कथा सतरावी

# तीन रेषांचे गूढ

राजाने परत मागे जाऊन वेताळाला खांद्यावर घेतले व तो चालू लागला. वेताळ म्हणाला, "राजा, अरे दुराग्रहालासुद्धा काहीतरी सीमा असावी; पण छे! तुझा काही विचार बदलत नाही! ठीक आहे. मी तुला आणखी एक कथा सांगतो ती ऐक –"

विचित्रनगरात राजा सौमित्र राज्य करीत होता. तो तरुण, शूर, उदार व रूपवान होता. त्याला अनेक राजकन्या दाखवण्यात आल्या होत्या; पण त्याला कोणतीच पसंत पडली नसल्याने राजा अजून अविवाहितच होता.

एकदा राजा शिकारीला गेला. जंगलात फिरता फिरता तो आपल्या परिवारापासून दूर झाला व वाट चुकला. बराच वेळ वाट सापडेना. शेवटी राजाने एक तळ्याजवळ घोड्याला सोडले. तो स्वतः पाणी प्याला. घोडाही पोटभर पाणी प्याला.

नंतर ताजेतवाने होऊन राजा इकडे तिकडे हिंडू लागला.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे समोरच्या विशाल वृटवृक्षाखाली कोणीतरी उभे आहे, असा त्याला भास झाला. त्याबरोबर त्याने निरखून पाहिले. एक सुंदर, नाजूक लावण्यवती त्या झाडाखाली उभी होती. राजा सौमित्र थोडा पुढे गेला. त्याबरोबर ती तरुणी लाजून, संकोचून उभी राहिली. सौमित्राला ती तरुणी एकदम आवडली. तिच्या अनुपम लावण्याने मोहित झालेला राजा स्वतःशीच म्हणाला, "ही कोण असावी ?"

इतक्यात तिची एक मैत्रीण तिथे आली. आता राजाचा संकोच एकदम दूर झाला. तो पुढे होऊन लावण्यवतीच्या मैत्रिणीला म्हणाला, "घरी अतिथी आला असताना त्याचे स्वागत न करता नुसते उभे राहण्याची ही तुमची कोणती रीत आहे ?"

तेव्हा ती सखी पुढे झाली व राजाला प्रणाम करून म्हणाली, "महाराज, गुरु भट्टाचार्यांचा जवळच आश्रम आहे. ही त्यांचीच कन्या आहे. हिचे नाव इंदिरा ! आपण आश्रमात चलावं."

राजा मोठ्या आनंदाने आश्रमात गेला. गुरु भट्टाचार्यांनी त्याचे मनापासून स्वागत केले. राजाने कुशलाची चौकशी करताच गुरु म्हणाले, "राजा, इथले सर्व वन्य पशू मला माझ्या मुलासारखे वाटतात. तू त्यांची उगाच हत्या का करतोस ? तेव्हा ही शिकारीची सवय सोडून दे आणि प्रजेकडे अधिक लक्ष दे."

राजाने "आज्ञा प्रमाण" असे म्हणून ती गोष्ट मान्य केली. त्यामुळे गुरु भट्टाचार्यांना फार आनंद झाला. ते म्हणाले, "राजा मी प्रसन्न आहे. हवा तो वर माग."

"गुरुमहाराज मला आपली कन्या, इंदिरा ही द्यावी एवढीच माझी इच्छा आहे."

गुरु भट्टाचार्यांनी दोन मिनिटे विचार केला व म्हटले, "तथास्तु ! इंदिरेच्या हातावर सम्राज्ञीची चिन्हे आहेतच तेव्हा मला या संबंधाने फार आनंद होईल."

गुरूंचे हे विचार ऐकताच राजा सौमित्राला फार आनंद झाला. लगेच योग्य मुहूर्त पाहून गुरु भट्टाचार्यांनी त्या दोघांचे लग्न लावले. थोडे दिवस आश्रमात राहून व पाहुणचार घेऊन राजा सौमित्र आपल्या नवपरिणीत वधूसह राजधानीकडे निघाला.


बरीच वाट चालल्यावर सायंकाळ झाली. एक मोठा पिंपळाचा वृक्ष पाहून राजाने तिथेच आराम करण्याचे ठरविले. सौमित्र व इंदिरा या दोघांचे एकमेकांवर फार प्रेम जडले होते. त्यामुळे प्रीतीच्या गुजगोष्टीत रात्र केव्हा संपली हे दोघांनाही कळले नाही. उजाडल्यावर आता निघावे म्हणून दोघेही उठून चालू लागणार तोच एक अक्राळविक्राळ ब्रह्मराक्षस त्यांच्यासमोर उभा राहिला.

खदखदा हसत मोठ्या क्रूरपणे तो म्हणाला, "हे उद्धट राजा, हा पिंपळ म्हणजे माझे निवासस्थान आहे. मी ब्रह्मराक्षस आहे. देव, यक्ष, गंधर्व सर्वजण माझ्याशी अदबीने वागतात. माझी मर्यादा पाळतात; पण तू रात्री येथे विषयक्रीडा केलीस. माझा अपमान केलास. मी आता तुम्हां दोघांना फाडून खाणार आहे. माझ्या अपमानाचा बदला घेणार आहे."

राजाने मनात विचार केला. ब्रह्मराक्षसाला काही ठार मारता येत नाही तेव्हा जरा युक्तीने घेऊ या. नंतर हात जोडून राजा म्हणाला, "अपराध नकळत झाला आहे. हा पिंपळ म्हणजे आपले निवासस्थान असेल याची आम्हांला कल्पना नव्हती. अपराधाची क्षमा करावी. आमच्या प्राणाशिवाय दुसरे काय हवे ते मागावे. मी देईन."

"बरं आहे! मग तू मला सात वर्षांचा एक ब्राह्मण कुमार अर्पण कर! त्याच्या आईवडिलांनी त्याचे हात धरले पाहिजेत व तू त्याचे शीर तोडून मला अर्पण केले पाहिजेस. आठ दिवसांत मला हा बळी मिळाला तर ठीक! नाहीतर मी तुझा नाश करीन!"

राजाने ते मान्य केले व तो राजधानीत आला. नवीन राणीचे जनतेने स्वागत केले; पण त्या स्वागतावर दुःखाची छाया पसरली होती. राजाने सर्व



सुवर्ण पुतळा मिरवत मिरवत शिपाई सर्व ठिकाणी फिरू लागले.

हकीगत लोकांना सांगितली होती. राजा व प्रधान या विषयावर चर्चा करीत असताना प्रधान म्हणाला, "महाराज, मला एक युक्ती सुचली आहे. मी आजच एक सुवर्णाचा पुतळा तयार करतो व सगळीकडे जाहीर करतो, की जो कोणी आपला सात वर्षांचा कुमार आम्हांला बळी देताना त्याचे हात धरायला तयार होईल त्या ब्राह्मणाला सुवर्णपुतळा बक्षीस मिळेल."

झाले! सुवर्ण पुतळा मिरवत मिरवत शिपाई सर्व ठिकाणी फिरू लागले. पाच दिवस गेले; पण कुणीही ब्राह्मण पुढे आला नाही. सहावे दिवशी एक दरिद्री ब्राह्मण पुढे आला व म्हणाला, "सरकार, मला आठ मुले आहेत, मी व माझी पत्नी आपला एक मुलगा तुम्हांला द्यायला स्वखुषीने तयार आहोत."

राजाला फार आनंद झाला. त्याने तो सुवर्णपुतळा ब्राह्मणाला दिलाच. इतकेच नव्हे तर तो राहात असलेले गावही त्याला जहागिरी म्हणून देऊन टाकले.

मुलाच्या आईला फार वाईट वाटत होते; पण करणार काय? पतीपुढे व राजापुढे ती अबला काय बोलणार? झाले. मुलाला घेऊन राजा व मुलाचे आईवडिल पिंपळाचे झाडाजवळ आले. महाराजांनी ब्रह्मराक्षसाला पाचारण केले. तो अक्राळविक्राळ राक्षस समोर उभा पाहाताच सर्वांची बोबडीच वळली.

तो ब्राह्मणकुमार मात्र हुशार होता. धीटपणे राक्षसाकडे पाहात तो म्हणाला, "ब्रह्मराक्षसा, मी आलो आहे. मार मला." आणि त्याने पायाने तीन रेषा मारल्या. प्रत्येक रेषेवर पाऊल टाकून खदाखदा हसत तो बलीवेदीवर उभा राहिला. क्षणभराने मरण येणार आहे हे माहीत असून ते बालक हसले. त्यामुळे सर्वजण आश्चर्यचकित झाले होते. ब्रह्मराक्षसही त्या मुलाकडे टक लावून पाहात होता.

एवढ्यात घाव घालण्यासाठी राजाने हात वर केला. त्या बरोबर ब्रह्मराक्षसाने राजाचा हात वरच्यावर धरला आणि म्हटले, "या मुलाच्या बुद्धिमत्तेवर मी खूष आहे. मी याला जीवदान दिले आहे. आता सर्वांनी घरी जावे."

एवढे बोलून ब्रह्मराक्षस गुप्त झाला! त्या तीन रेषांचे गूढ कोणासच कळले नाही. कारण तो ब्राह्मणपुत्र जीवनदान मिळताच अरण्यात तपश्चर्येसाठी निघून गेला होता.

एवढी कथा सांगून वेताळ विक्रमाला म्हणाला, "विक्रमा, त्या बालकाने तीन रेषा का ओढल्या? आणि त्याने प्रत्येक रेषेवर पाऊल ठेवताच तो का हसला?"

विक्रमाने उत्तर दिले, "वेताळा, संकटाच्यावेळी सर्वप्रथम मनुष्य आईवडिलांना हाक मारतो. ते आपले रक्षण निश्चित करतील अशी त्याला

खात्री असते. आईबाप नसले तर प्रजेचे रक्षण करणारा जो राजा असेल त्याला हाक मारतो आणि आईवडिल, राजा तिघेही नसतील तर आपण ग्रामदेवतेच्या नावाने हाक मारतो ती ग्रामदेवता आपले रक्षण निश्चित करील असा विश्वास असतो.

"त्या ब्राह्मणपुत्राने पहिली हाक आईवडिलांना मारली. म्हणून एक रेष ओढली; पण ते आईबाप त्याचे हात धरून वधस्तंभाकडे नेत होते. दुसरी रेष राजाला हाक मारण्यासाठी ओढली; पण खुद्द राजाच त्याचा स्वतःचाच जीव वाचविण्यासाठी बळी देणार होता. शेवटी तिसरी रेष त्या ब्रह्मराक्षसाला हाक मारण्यासाठी मारली. कारण तो पिंपळ व त्यावरील ब्रह्मराक्षस म्हणजे त्याची ग्रामदेवता होती. पहिल्या दोन हाका स्वार्थापायी फुकट गेल्या. शेवटची हाक देवाला समजली व त्याने त्या मुलाला सोडून दिले. संसाराची निती बघून या जगाच्या भोंदूपणाला अल्पवयातच कंटाळलेला तो ब्राह्मणकुमार अरण्यात निघून गेला आणि याच कारणासाठी ते बालक प्रत्येक रेषेवर खदखदून हसले."

विक्रमाचे उत्तर ऐकताच वेताळ त्याच्या खांद्यावरून उडाला व जंगलात जाऊन झाडावर पूर्वीप्रमाणेच लोंबकळू लागला.



## कथा अठरावी

# माळ कोणाला घालावी?



राजा विक्रम परत चालू लागला. तेव्हा प्रेतातला वेताळ विक्रमाला म्हणाला, "हे विक्रमा, राजवाड्यात आराम करायचे सोडून तू हे निष्कारण कष्ट घेतो आहेस. असो. मी तुला आणखी एक कथा सांगतो. ती ऐक–"

चंपापूरच्या महाराजांना सुशीला नावाची फार फार सुंदर गुणी, हुशार अशी एक कन्या होती. सुशीला आईवडिलांची इतर सर्वांचीच फार लाडकी होती.

बोबडे बोल बोलणारी सुशीला हळुहळू उपवर झाली. इतर कलांबरोबर तिला लढण्याचे शिक्षणही राजाने दिलेले होते. तिला सर्वांकडून मागण्या येऊ लागल्या. रात्रंदिवस राजवाड्यात त्याच गोष्टीची चर्चा चालू झाली. आपल्या रूपगुणसंपन्न मुलीला योग्य पती कसा मिळेल याची राजाला चिंता पडली.

देशोदेशीहून राजपुत्रांच्या अनेक तसबिरी आल्या होत्या. सुशीलेच्या मनात अजून एकही राजपुत्र भरला नव्हता. रूप, बल व ज्ञान हे गुण असलेला पती तिला हवा होता.

एक दिवस काय झाले? चार देशाहून चार तरुण राजाकडे एकदम एकाच वेळी आले. चौघेही दिसायला अत्यंत सुंदर होते. सुशिक्षित होते. पहिला तरुण म्हणाला, "महाराज, मी दररोज पाच तलम वस्त्रे विणतो. एक ब्राह्मणाला, एक देवाला देतो. तिसरे माझ्या स्वतःच्या खर्चासाठी, चौथे माझ्या भावी पत्नीच्या खर्चासाठी व पाचवे प्रपंचासाठी असे वापरतो. माझी

ही विद्या जगात दुसऱ्या कुणालाही माहीत नाही. म्हणून तुमची कन्या मला द्यावी अशी माझी विनंती आहे."

दुसरा म्हणाला, "मी पशुपक्ष्यांची भाषा जाणतो. माझ्यासारखा या विद्येत पारंगत असलेला दुसरा तरुण नाही म्हणून आपली सुलक्षणी कन्या आपण मलाच द्यावी."

तिसरा म्हणाला, "मी बलवान तर आहेच; पण मेलेल्या प्राण्याला पुन्हा जिवंत करू शकतो."

शेवटी चौथा म्हणाला, "माझे रूप व सशक्तपणा प्रत्यक्षच पाहात आहात. मी शस्त्रविद्येत अतिशय निपुण आहे. आज तरी या पृथ्वीतलावर असा वीर नाही, की जो माझा पराजय करू शकेल, तेव्हा आपण मलाच आपला जामात करावे."

राजाने चौघाही तरुणांच्या परीक्षा घेतल्या. खरोखर जो तो आपापल्या विद्येत निपुण होता. आता यातून मुलीला कोणता वर योजावा असा राजाला प्रश्न पडला.

एवढी कथा सांगून वेताळ विक्रमराजाला म्हणाला, "विक्रमा, आता त्या राजाला पडलेला पेच तू सोडव. त्या चौघांपैकी कोणाला सुशीलेने माळ घालावी?"

तेव्हा विक्रम म्हणाला, "वेताळा, कापड विणणारा तरुण शूद्र जातीचा होय. पशुपक्ष्यांची भाषा जाणू शकणारा वैश्य होय. प्राण्यात जीव ओतू शकणारा ब्राह्मणपुत्र होय आणि शास्त्रविद्येत निपुण असणारा क्षत्रिय होय. सुशीला ही राजकन्या होती. क्षत्रिय होती म्हणून तिला तो चौथा क्षत्रिय तरुणच योग्य आहे."

विक्रमाचे हे उत्तर ऐकताच वेताळ त्याच्या खांद्यावरून उडाला व जंगलातील झाडावर जाऊन बसला.

## कथा एकोणीसावी

# सुवर्णवृक्षावरील सुंदरी



राजा विक्रम पुरत मागे फिरला. जंगलात जाऊन त्याने प्रेत आपल्या खांद्यावर घेतले व मार्गक्रमण करू लागला. तेव्हा वेताळ त्याला म्हणाला, "राजा, तू फार दमला आहेस. तुझा श्रमपरिहार होण्यासाठी मी तुला अजून एक गोष्ट सांगतो, ऐक–"

पुण्यनगरीत वल्लभराय नावाचा राजा राज्य करीत होता. तो फार विलासी आणि सदैव नाचगाण्यात रंगलेला असे. राज्यकारभाराकडे नेहमी दुर्लक्ष करी. त्याचा प्रधान सत्यजित हाच सर्व कारभार पाहात असे. त्यामुळे राजाची विलासप्रियता दिवसेंदिवस वाढतच होती.

शेवटी सत्यजिताने ठरविले, की आपण तीर्थयात्रेला म्हणून देशाबाहेर जावे म्हणजे तरी राजा राज्यकारभारात लक्ष घालेल. प्रथम राजा प्रधानास तीर्थयात्रेला परवानगी देईना. शेवटी नाईलाजाने त्याने परवानगी दिली. पडत्या फळाची आज्ञा घेऊन प्रधान निरनिराळ्या तीर्थक्षेत्रात फिरू लागला.

एक दिवस नावेत बसून जात असता समुद्राच्या लाटात त्याला एक सुंदर सुवर्णवृक्ष दिसला. त्याच्या फांद्या सुवर्णाच्या होत्या व फळे रत्नांची होती. त्या वृक्षावर एक सुंदर तरुणी आपल्या मधुर आवाजात जोगीया राग आळवत होती. गाणे संपताच तो वृक्ष तरुणीसह नाहीसा झाला. तो वृक्ष व ती तरुणी कोण ? आपल्याला दिसले ते सत्य की असत्य ? याबद्दल त्याने नावेतील इतर लोकांना विचारले असता त्यांनीही "असे आम्हांला नेहमीच दिसते," म्हणून सांगितले.



...त्यावर एक सुंदरी आपल्या मधुर आवाजात गात होती.
राजाने सुंदरीला पाहाताच पाण्यात उडी टाकली.

तीर्थयात्रा संपवून प्रधान राजधानीत आला. प्रधानाचे गैरहजेरीत राजा खूप सुधारला होता. वल्लभरायाने प्रधानाचे स्वागत केले आणि तीर्थयात्रा कशी काय झाली असे विचारले. प्रधानाने सर्व हकीकत सांगितली. अद्‌भुत सुवर्णवृक्ष व सुंदरीचे मधुर गाणेही वर्णन करून सांगितले, "सत्यजिता, मी तिकडे जाऊन प्रत्यक्ष ती सुंदरी पाहाणार आहे. तूच आता राज्य-कारभार पाहा?" असे म्हणून प्रधानाच्या विरोधास न जुमानता राजा प्रवासाला निघाला.

अनेक देश, नद्या, पर्वत ओलांडून तो समुद्रतीराला आला व मोठ्या जहाजात बसून प्रवास करू लागला. जहाज भर समुद्रात आल्यावर लाटातून एक सुवर्णवृक्ष वर आला. त्यावर एक सुंदरी आपल्या मधुर आवाजात गात होती. राजाने सुंदरीला पाहाताच पाण्यात उडी टाकली. त्याने तो अद्‌भुत

सुवर्णवृक्ष गाठला व त्याचे फांदीवर चढून बसला. गाणे संपताच तो वृक्ष पाण्यात गुप्त झाला.

त्या वृक्षाबरोबर राजाने एका दिव्य नगरात प्रवेश केला. नगरात वस्ती नसावीच. एका महालाचे दार उघडे पाहून राजा आत शिरला, तोच त्याला गाणारी सुंदरी दिसली. राजाला फार आश्चर्य वाटले. तसेच, त्या सुंदरीलाही राजाला पाहून आश्चर्य वाटले आणि तिने विचारले "आपण कोण ? आणि येथे कसे आलात ?"

राजाने तिला सर्व हकीकत सांगितली आणि म्हणाला, "हे सुंदरी मला तू फारच आवडली आहेस. माझ्याशी लग्न करशील का ?"

हरिणाक्षीला – सुंदरीलाही राजा फार आवडला होता. ती म्हणाली, "अगदी आनंदाने; पण माझी एक अट आहे. ती मान्य कराल तरच मी लग्न करीन. ती अट अशी : दर महिन्याचे अष्टमीला व चतुर्थीला मी हवे तेथे जाईन. आपण आडकाठी करायची नाही."

राजाने तत्परतेने तिची अट मान्य केली व दोघांनी गांधर्व पद्धतीने विवाह केला. त्या अद्भुत नगरात राजा आणि हरिणाक्षीचे मोठ्या आनंदात दिवस जात होते. दर चतुर्थी-अष्टमीला आपली पत्नी कुठे जाते याचे राजाला कोडेच पडले. त्याने मनाशी निश्चय केला, की या गूढाचा शोध लावायचाच. अष्टमीचे दिवशी हरिणाक्षी पतीच्या आज्ञेने बाहेर निघाली त्यावेळी राजाही तिच्या मागून जाऊ लागला. नगरीच्या सीमेवर त्यावेळी हरिणाक्षी येताच एका प्रचंड राक्षसाने तिला खाऊन टाकले. त्याबरोबर राजाने रागाने राक्षसावर हल्ला करून त्याला ठार केले. तेवढ्यात त्या मेलेल्या राक्षसाची छाती फोडून हरिणाक्षी बाहेर आली व तिने राजाला मिठी मारली.

राजाने "हा काय प्रकार आहे ?" असे विचारताच हरिणाक्षी म्हणाली, "महाराज आज तुमचे माझ्यावर फार उपकार झालेत. माझे वडील विद्याधरांचे राजे होते. मी त्यांची फार लाडकी व हट्टी कन्या. एके दिवशी मी हट्टाने त्यांची गोष्ट ऐकली नाही. ते फार रागावले व त्यांनी मला शाप दिला,

की ' या पुढे तू या नगरात एकटीच राहाशील व दर अष्टमी व चतुर्थीला एक भयंकर राक्षस तुला खाऊन टाकेल. मग तू त्याची छाती फोडून बाहेर येशील. हे करताना तुला आत्यंतिक वेदना होतील. तूही मरणार नाहीस व तो भयंकर राक्षसही मरणार नाही.' मी त्यांची क्षमा मागितल्यावर त्यांनी उःशाप दिला. तुला जेव्हा रसिक पती मिळेल व तुला खाल्ल्यावर लगेच राक्षसाला ठार मारेल तेव्हा तू या शापातून तत्काळ मुक्त होशील," असे सांगून हरिणाक्षी म्हणाली, "आता आपण माझे वडिलांकडे जाऊ या का?"

राजा म्हणाला, "सुंदरी प्रथम आपण आपल्या राज्यात जाऊ."

राजा हरिणाक्षीला घेऊन आपल्या पुण्यनगरीत आला. नगरजनांनी उत्तम स्वागतसोहळा केला. आता हरिणाक्षीच्या ओढीने राज्यकारभारातून राजाने अजिबात लक्ष काढून घेतले. प्रधान सर्व कारभार चोख ठेवत असे; पण त्याच्या मनाला सारखी चिंता लागून तो लवकरच मरण पावला. प्रधानाच्या मृत्यूनंतर राजाला आपली चूक कळून आली व त्याला फार वाईट वाटले.

एवढी गोष्ट सांगून वेताळ म्हणाला, "तो प्रधान काळजीने मरण का बरे पावला? त्याला हरिणाक्षी स्वतःला हवी होती? की त्याला राज्य बळकावयाचे होते, ते शक्य झाले नाही म्हणून?"

विक्रम म्हणाला, "नाही वेताळा असे नाही. प्रधान हा खरोखरच चांगला होता. त्याला ती सुंदरीही नको होती आणि राज्यही नको होते. आपला राजा सामान्य स्त्रीलाही भुलतो मग ही तर अत्यंत सुंदर. आता राजा कारभार पाहाणारच नाही. या चिंतने तो मरण पावला."

हे विक्रमाचे उत्तर ऐकताच वेताळ त्याचे खांद्यावरून अदृश्य झाला व परत झाडावर प्रेत होऊन लोंबकळू लागला.

* * *

## कथा विसावी

# विद्या का नष्ट झाली?

राजा विक्रम परत फिरला. स्मशानात येऊन परत झाडावरील प्रेत आपल्या खांद्यावर घेऊन निघाला. तेव्हा वेताळ म्हणाला, "हे पराक्रमी सत्यवादी पुरुषा, मी तुला आणखी एक गोष्ट सांगतो ती ऐक–"



चंद्रप्रकाश नावाच्या प्रधानाला सूर्यनाथ म्हणून एक मुलगा होता. मुलगा बापासारखा व्यवहारदक्ष नव्हता. तो उधळ्या होता. जुगारी होता. त्याने विद्याभ्यास सोडून दिला होता. नेहमी तो जुगाराच्या अड्ड्यावर पडलेला असे.

एक दिवस जुगार खेळता खेळता तो कफल्लक झाला. पैसा अडका, अंगावरील दागिने सर्व काही जुगारात हरल्यामुळे तो निराश झाला. त्यातच त्या अड्ड्याच्या मालकाने त्याला बेदम मारले व एका ओसाड भागात आणून टाकले.

सर्वांना वाटले, तो मेला; पण तो बेशुद्ध पडला होता. रानाची गार हवा लागताच तो शुद्धीवर आला. आपली असह्य स्थिती पाहून त्याला रडू आले. 'आता मी जाऊ कुठे? माझे आईबाप मला काय म्हणतील?' या विचाराने तो व्याकुळ झाला. त्याने सभोवताली पाहिले. जवळ एक शिवालय दिसत होते. "त्या देवळात रात्र काढू व मग उद्या काय करायचे ते करू!" असे म्हणून तो त्या देवळात कसाबसा गेला. डोंगरमाथ्यावरच्या गार हवेने त्याला शांत झोप लागली.

सूर्य उगवला आणि त्याच्या कोवळ्या किरणात न्हात एक वृद्ध तपस्वी त्या देवळात शिरला. हातात त्रिशूळ, डोक्यावर जटा, लांब दाढी, अंगावर

भस्म अशा वेषातला तो साधू म्हणजे प्रत्यक्ष भगवान शंकरच वाटत होता. त्याची चाहूल लागताच सूर्यनाथाने डोळे उघडले. त्याबरोबर त्या साधूने विचारले " तू कोण आहेस ? येथे काय करतोस ? "

जेव्हा सूर्यनाथाने तपस्व्याला सर्व हकीकत सांगितली तेव्हा तपस्वी म्हणाला, " बरे आहे! सूर्यनाथ, आज तू माझा अतिथी आहेस, तेव्हा ही भिक्षा तू घे. "

" महाराज, मी ब्राह्मण आहे. मी भिक्षा कशी घेऊ? "

" असं ? बरं, जरा थांब ? " असे म्हणून तो तपस्वी मठीत शिरला. त्याने इष्टसंपादिनी विद्येचे स्मरण केले. त्याबरोबर ती विद्या तेथे हजर झाली. " या तरुणाचे नीट आतिथ्य कर. त्याचा सांभाळ कर. " तपस्वी तिला म्हणाला.

" हो. " म्हणून ती अदृश्य झाली.


क्षणार्धात तेथे एक सुवर्णनगरी निर्माण झाली. राजवाड्यात दास-दासी, शिपाई राबू लागले. माळी फुलांचे हार गुंफू लागले. आचारी-पाणक्यांची धांदल सुरू झाली. काही सुंदर दासी सूर्यनाथाजवळ आल्या व म्हणाल्या, " महाराज, उठा स्नान करा. भोजन तयार आहेच. "

तेव्हा तो दासींबरोबर आत गेला. दासींनी सुवर्णपात्रातून त्याला अभ्यंग स्नान घातले. सुग्रास भोजन दिले आणि नंतर त्याने गुबगुबीत गाद्यांवर ताणून दिली.

सकाळ झाली. तो उठला. आता रात्रीची सुवर्णनगरी नाहीशी झाली होती. तो शंकराचे देवळात झोपलेला होता. त्याने तपस्व्याला विचारले, " हे कसं काय ? "

" काही काळजी करू नकोस. रोज रात्री तुला तसेच सुख मिळेल. " तपस्वी म्हणाला.

बरेच दिवस तपस्व्याचे अनुग्रहामुळे सूर्यनाथ ते स्वर्गसुख भोगत होता; पण एक दिवस सूर्यनाथाला वाटले, " या तपस्व्याचे उपकार घेत किती



...साधकाला मोह पडण्याचा संभव असतो. आपण
लहान मूल आहोत असे वाटते. बायका-मुले समोर...

दिवस राहावे? त्यापेक्षा आपणच ती विद्या संपादन करून घ्यावी." असा विचार मनात येताच सूर्यनाथ तपस्व्याजवळ गेला आणि म्हणाला, "महाराज, कृपा करून आपण मला ही विद्या शिकवावी."

"मुला, ही विद्या शिकणे फार कठीण आहे. पाण्यात गळ्याइतके बुडून मंत्र जपावा लागतो. जप करताना साधकाला मोह पडण्याचा संभव असतो. आपण लहान मूल आहोत असे वाटते. बायका-मुले समोर दिसतात. या मोहांना न जुमानता दोन तपे जर ही जपसाधना केली तरच ही विद्या प्राप्त होते. नाहीतर विद्या मिळत नाहीच; पण शिष्याबरोबर गुरूचीही विद्या नष्ट होते. तेव्हा या फंदात पडू नकोस! तुला वाटेल ते सुख द्यायला मी समर्थ असताना तुला ही विद्या हवी कशाला?"

पण सूर्यनाथ काही ऐकेना. "आपण ही चोवीस वर्षांची दीर्घ तपश्चर्या करू." असे त्याने सांगितले. त्यामुळे शेवटी तो तपस्वी त्याला विद्या द्यायला तयार झाला.

त्याला नदीवर नेऊन तपस्वी म्हणाला, "ज्यावेळी तू माया पाहाशील त्यावेळी मी तुला प्रबोधिनी विद्येनेच सावध करीन. त्यावेळी मात्र तू लगेच मायाग्नीत प्रवेश कर."

मग सूर्यनाथ पाण्यात शिरून जप करू लागला. थोड्याच दिवसात त्याला स्वतःचे घर दिसू लागले. आपले बालपण, मुंज, विवाह नवपरिणीत पत्नी सारे काही डोळ्यांसमोर नाचू लागले. नंतर मुलेही आली. याच वेळी गुरूने त्याला प्रबोधिनी विद्येने सावध केले आणि सांगितले, "तुला दिसते ते सर्व माझ्याजवळ आहे, तेव्हा तू मायाग्नीत प्रवेश कर."

सूर्यनाथ अग्निप्रवेश करायला तयार झाला. त्याबरोबर त्याचे आई-वडील, बायका-मुले त्याला अडवू लागली. रडू लागली, तेव्हा सूर्यनाथाला प्रश्न पडला, की 'आपला मंत्र व तपस्वी हे खरे, की ही बायका-मुले खरी?'

पुष्कळ वेळ विचार केल्यावर त्याने ठरवले, की 'मंत्र व तपस्वी हे खरे आहेत!' एवढे ठरवून त्याने मायाग्नीत प्रवेश केला; पण अग्नी त्याला बर्फासारखा थंड वाटला. तो तसाच बाहेर आला व त्याने गुरूला ही गोष्ट सांगितली.

तेव्हा तो तपस्वी म्हणाला, "वत्सा, तुझ्या हातून काही तरी चूक झाली आहे. अग्नि थंड कसा भासेल बाबा?"

"पण गुरुमहाराज, माझे काहीच चुकले नाही. मला खात्री आहे." सूर्यनाथ म्हणाला; पण तपस्व्याला ते पटले नाही. त्याने स्वतः त्या विद्येचे स्मरण केले. इष्टसंपादिनी प्रगट झाली नाही. विद्या गेल्याने दोघांनाही फार दुःख झाले.

एवढी कथा सांगून वेताळ विक्रमाला म्हणाला "विक्रमा, सूर्यनाथाने गुरुवचनाप्रमाणे सर्व काही केले असताना दोघांची विद्या का नष्ट व्हावी?"

"वेताळा," विक्रम बोलू लागला, "केवळ धर्म करून सिद्धी मिळते असे नाही. कर्म आचरताना मनात विकल्प येता कामा नये. गुरूच्या वचनाविषयी, खरेपणाविषयी थोडा वेळ का होईना; पण सूर्यनाथाचे मन साशंक झाले म्हणून त्याला सिद्धी मिळाली नाही. सूर्यनाथासारख्या अयोग्य शिष्याला पूर्ण विचार न करता विद्या द्यावयास तो तपस्वी तयार झाला. त्यामुळे गुरूची विद्याही नाहीशी झाली."

हे उत्तर ऐताच वेताळ विक्रमाचे खांद्यावरून निसटला नि झाडाला लोंबकळू लागला.



## कथा एकविसावी

# बंधू कोण व पती कोण?

विक्रम पुन्हा मागे फिरला. तेव्हा वेताळ त्याला म्हणाला, "राजा, तू एखादे कठोर व्रतच आचरतो आहेस. म्हणून मी तुला आणखी एक कथा सांगतो ऐक–"

विशालनगरीत धर्मराज राज्य करीत होता. तो नावाप्रमाणे धार्मिक होता. त्यामुळे त्याने गावोगाव देवळे, तलाव, धर्मशाळा वगैरे बांधली होती. राजधानीबाहेर अंबाबाईचे एक सुंदर देऊळ होते. देवळासमोर एक मोठा तलाव होता.

नवरात्रात देवीची यात्रा भरे. यात्रेसाठी लांबून लांबून लोक येत असत. एकदा जवळच्या गावातून धवल नावाचा एक परटाचा मुलगा आला होता.

तळ्यावर एक पंधरा वर्षांची सुंदर मुलगी कपडे धुत होती. तिचे लावण्य, आकर्षक बांधा, शालीन वृत्ती हे पाहून धवल परटाचे मन तिच्यावर बसले. त्याने ठरविले, की हीच आपल्याला पत्नी म्हणून हवी!

धवलाच्या घरचे वळण फार चांगले होते. त्याने आपल्या आईला ही हकीकत सांगितली. आईच्या सांगण्यावरून धवलाच्या वडिलांनी त्या मुलीची चौकशी केली. तेव्हा ती कन्या म्हणजे त्याच्या बालमित्राची मुलगी असून तिचे नाव ऊर्वशी आहे असे त्याला समजले.

मग धवलाचे वडिलांनी मुलीला मागणी घातली. सर्वांच्या संमतीने हा विवाह ठरला. योग्य मुहूर्तावर ऊर्वशीचा व धवलचा विवाह झाला. दोघेही एकमेकांवर पूर्ण अनुरक्त असल्याने त्यांचा संसार सुखात चालला होता. दिवस भराभर जात होते.

एक दिवस ऊर्वशीचा भाऊ तिच्या घरी आला. भाऊ आल्याने ऊर्वशीलाही फार आनंद झाला. जेवणखाण झाल्यावर भाऊ धवलाला म्हणाला, "परवा आमच्या गावी अंबाबाईचा उत्सव आहे, तरी त्यासाठी तुम्ही व ताईने तिकडे यावे, अशी वडिलांची इच्छा आहे तेव्हा आपला विचार सांगावा."

सासऱ्यांच्या इच्छेला मान देऊन धवल पत्नीसह सासुरवाडीला जायला निघाला. तिघेजण गप्पा मारीत चालले होते. रस्ता केव्हा संपला तो तिघांनाही कळले नाही. गावची वेस येताच सर्वजण तेथे थांबले. अंबाबाईचे देऊळ व त्यासमोरील तलाव पाहाताच धवलच्या जुन्या आठवणी जाग्या झाल्या. त्याने त्याबाबत बोलायला सुरुवात करताच ऊर्वशी लाजून गेली.


धवल पत्नीला व मेव्हण्याला म्हणाला, "मी देवळात जाऊन देवीचे दर्शन घेऊन येतो. तुम्ही येथेच थांबा."

धवल देवळात गेला. देवीवर त्याची अनन्यसाधारण श्रद्धा होती. देवीला नमस्कार केल्यानंतर त्याच्या लक्षात आले, की आपण रिक्त हस्ताने

आलो आहोत. क्षणाचाही विचार न करता त्याने देवीच्या पुढे असलेली तलवार उचलली व आपले शिरकमल देवीला अर्पण केले.

'बराच वेळ झाला तरी मेव्हणा का येत नाही?' असे म्हणून ऊर्वशीचा भाऊ देवळात गेला. समोरचे दृश्य पाहून त्याला फार वाईट वाटले. त्या दुःखाच्या आवेगातच त्यानेही तलवार उचलली व आपले शीरही देवीला अर्पण केले.

'पती व भाऊ देवळातून परत का येत नाहीत,' याचे आश्चर्य वाटून स्वतः ऊर्वशी देवळात शिरली. देवीसमोरचा विलक्षण देखावा पाहून ती क्षणभर सुन्न झाली. क्षणभर बावरली; पण नंतर लगेच तिचे मन ताळ्यावर आले. देवीला नमस्कार करून ती म्हणाली, "देवी, माझे प्राणप्रिय पती व प्रिय



"...जन्मोजन्मी मला हाच पती व हाच भाऊ लाभो."
एवढे बोलून उर्वशी तलवारीचा घाव मस्तकावर घालणार तोच...

भाऊ तुझ्या भेटीसाठी निघून गेले आहेत तर मीही त्यांच्या मागोमाग येते; परंतु जन्मोजन्मी मला हाच पती व हाच भाऊ लाभो." एवढे बोलून ती तलवारीचा घाव मस्तकावर घालणार तोच...

...देवी प्रकट झाली आणि म्हणाली, "मुली, तुझे हे असामान्य धैर्य पाहून मी खूष झाले आहे. तुझ्यावर प्रसन्न झाले आहे. तू तुझ्या भावाचे व पतीचे मस्तक त्यांच्या धडावर चिकटव म्हणजे ते दोघे जिवंत होतील."

देवीचे शब्द ऐकताच ऊर्वशीला इतका आनंद झाला, की काय करावे ते तिला सुचेना. घाईघाईने तिने एका धडावर एक तुटलेले मस्तक चिकटवले, त्याबरोबर त्या देहात थोडी हालचाल दिसताच दुसऱ्या धडाला दुसरे मस्तक लावले. दोघेही जिवंत होताच सर्वांनी देवीला प्रणाम केला व ते देवळाबाहेर आले. देवळाबाहेर उजेडात आल्यावर ऊर्वशीने बारकाईने दोन्ही पुरुषांकडे पाहिले. तेव्हा आपली चूक तिच्या लक्षात आली. आनंदाच्या भरात तिने पतीचे मस्तक भावाच्या धडाला व भावाचे मस्तक पतीच्या धडाला चिकटविले होते. आता काय करावे हे तिला समजेना.

"राजा विक्रमा, आता तूच सांग त्या दोघांतील ऊर्वशीचा पती कोण व बंधू कोण?"

"वेताळा," विक्रमाने उत्तर दिले, "पतीचे मस्तक ज्या धडावर आहे तो तिचा पती व दुसरा भाऊ. कारण सर्व शरीरात मेंदू हाच मुख्य असतो. त्याच्या प्रेरणेनेच सारे व्यापार चालतात, तेव्हा मस्तक अधिक श्रेष्ठ होय."

राजाचा मौनभंग होताच वेताळ अदृश्य झाला.



## कथा बाविसावी

# मूर्ख परिक्षित



विक्रमाने न कंटाळता माघारी जाऊन ते प्रेत पुन्हा खाली काढले व ते आपल्या खांद्यावर घेऊन विक्रम चालू लागला. तेव्हा प्रेतातील वेताळ म्हणाला, "हे धैर्यवान पुरुषा, तुला मी आणखी एक कथा सांगतो."

विशाखापट्टण नगरीत राजा पद्मसेन राज्य करीत होता. त्याच्या नगरात रामनाथ नामक एक श्रीमंत सावकार रहात होता. त्याला मेनका नावाची अतिशय लावण्यवती मुलगी होती. मेनकेचा विवाह तिच्या वडिलांनी म्हणजे रामनाथशेठनी त्यांच्याच बालमित्राच्या सोमदत्तशेठच्या मुलाशी परिक्षिताशी ठरवला होता.

मेनका ही एकुलती एक मुलगी असल्याने परिक्षित घरजावई म्हणून रामनाथचा सर्व कारभार पाहू लागला. त्याच्याकडेच तो रहात होता. आपल्या सुंदर पत्नीवर त्याचे फार प्रेम होते. दुर्दैवाची गोष्ट अशी, की मेनकेचे आपल्या पतीवर अजिबात प्रेम नव्हते. ती त्याचा द्वेष करी. त्याचे कोणतेच काम करीत नसे. त्याला उलट उत्तरे देत असे. तरीही परिक्षित तिच्यावर जिवापाड प्रेम करीत असे.

एकदा परिक्षित मालाच्या खरेदीसाठी दुसऱ्या गावी गेला होता. पंधरा दिवस तो येणार नव्हता. एक दिवस मेनका आपल्या वाड्याच्या गच्चीत उभी असताना तिला एक रुबाबदार तरुण रस्त्यातून जाताना दिसला. एक क्षणभर दोघांची दृष्टभेट झाली. कामदेवाने तो क्षण अचूक साधून त्यांच्यावर शरसंधान केले. दोघे एकमेकांच्या प्रेमातही पडली; पण मेनका विवाहित स्त्री होती. त्यामुळे दोघांनाही प्रेम व्यक्त करता आले नाही.

मेनकेकडे वळून पाहात सुस्कारे टाकीत तो तरुण पुढे निघून गेला. तो दिसेनासा झाल्यावर मेनका आपल्या शय्यागृहात परतली. तिलाही काही सुचेना. तिने त्यावेळेपासून अन्नपाणी वर्ज्य केले.

दोन-तीन दिवसातच ती आजाऱ्यासारखी दिसू लागली. तिच्या दासीला तिची ही स्थिती पाहावेना. तिने मोठ्या युक्तीने आजाराचे कारण समजावून घेतले.

"एक दोन दिवसात आपली व त्या तरुणाची भेट करून देते; परंतु आपण अन्नपाणी सोडू नका." असे सांगून ती दासी आपल्या कामाला लागली. तो तरुण कोण आहे ? कुठे रहातो ? काय करतो याची सर्व माहिती तिने काढली.

त्यानंतर ती त्याला जाऊन भेटली. तो तरुणही विरहाने मेनकेसारखाच कृश झाला होता. दासीने त्या तरुणाला मेनेकेची मनःस्थिती समजावून सांगितली. तिला भेटण्यासाठी शहराबाहेरच्या बागेत रात्री येण्याचे त्याने मोठ्या आनंदाने कबूल केले.

ठरल्याप्रमाणे दोघेही बागेत आले. त्याला पाहताच अधीर झालेल्या मेनकेने त्याला घट्ट मिठी मारली. तो आनंदाचा आवेग सहन न होऊन तिचे तत्क्षणीच प्राणोत्क्रमण झाले. भांबावलेल्या त्या तरुणाच्या लक्षात ही गोष्ट येताच तोही आपल्या प्रियेसाठी व्याकुळ झाला व बेशुद्ध पडला. थोड्यात वेळात त्याचेही प्राण निघून गेले.

प्रेते पाहून भांबावलेली दासी मोठ्याने रडू लागली. त्याचबरोबर बागेचे रखवालदार तेथे धावून आले. त्यांनी दोघांच्या नातेवाईकांना चौकशीसाठी बोलावले. दोघांच्या घरची माणसे आली. "ही इथे कशी ?", "हा इथे कसा ?" असे उद्गार प्रत्येकाचे नातेवाईक काढत आहेत. तोच मेनकेचा पती परिक्षित तेथे आला. आपल्या लाडक्या पत्नीचे प्रेत पाहाताच त्याला अतिशय दुःख झाले. त्यामुळे मूर्च्छा येऊन तोही खाली पडला. त्या बेशुद्धीतून तो शुद्धीवर आलाच नाही. तोही मरण पावला.

एव्हाना खूप लोक जमले होते. सर्वजण एकमेकात चर्चा करीत होते. रामनाथ हा अंबिकेचा भक्त होता. त्याने देवीची प्रार्थना केली व म्हणाला "या तिघांना जिवंत कर. नाहीतर मीही प्राण देईन." त्याचा निश्चय पाहून देवी प्रगट झाली. तिने या तिघांना जिवंत केले. त्याबरोबर तो तरुण शरमून स्वतःच्या घराकडे पळाला. मेनकेने शरमेने मान खाली घातली. परिक्षिताने पुन्हा आपल्या पत्नीचा हात धरला व ते सर्व घरी आले.

एवढी कथा सांगून वेताळ म्हणाला, "विक्रमा, प्रेमात मूर्ख बनलेल्या त्या तिघांपैकी सर्वात जास्त मूर्ख कोण?"

"वेताळा," विक्रमाने उत्तर दिले, "त्या तिघात परिक्षितच अधिक मूर्ख! मेनकेचे व त्या तरुणाचे एकमेकांवर जरी प्रेम होते तरी आपले मीलन होणे शक्य नाही. (कारण मेनका विवाहित होती) म्हणून त्यांनी एकमेकांनी प्राणत्याग केला; पण आपली पत्नी परपुरुषावर अनुरक्त आहे हे समजूनही जो मूर्ख तिच्यासाठी आपले प्राण सोडतो, त्याला काय म्हणावे? वास्तविक परिक्षिताला तिचा संताप यायला हवा होता. तो तिचा हात धरून तिला पुन्हा घरी घेऊन का गेला?"

विक्रमाचे उत्तर ऐकताच वेताळ त्याच्या खांद्यावरून उडाला व पुन्हा झाडावर जाऊन बसला.



## कथा तेविसावी

# योगी का रडला ?



विक्रम चिकाटीने मागे फिरला. त्याने प्रेताला पुन्हा खांद्यावर घेतले व चालू लागला. तेव्हा वेताळ त्याला म्हणाला, "हे धैर्यवान पुरुषा ! तुझे श्रम कमी व्हावेत म्हणून मी तुला एक गोष्ट सांगतो ऐक !"

अवंतीनगरात शुक्राचार्य नावाचा एक विद्वान ब्राह्मण रहात होता. बरेच दिवस मूलबाळ झाले नाही म्हणून तो दुःखी होता. तो शंकराची एकनिष्ठेने पूजा करीत असे. काही दिवस असेच गेले आणि शुक्राचार्याला एक पुत्र झाला. उशीरा का होईना; पण पुत्ररत्न प्राप्त झाल्याने ब्राह्मणाला फार आनंद झाला. त्याने मोठा समारंभ केला. त्याचे नाव मोठ्या प्रेमाने 'बृहस्पती' असे ठेवले. हा 'बृहस्पती' नावाप्रमाणेच फार हुशार होता. अवघ्या सोळाव्या वर्षी तो सर्व विद्यांत प्रवीण झाला.

दुर्दैवाने बृहस्पती आजारी पडला. दोन-चार दिवस ताप आला. कुणाच्याही औषधाचा गुण न येता बृहस्पती मरण पावला. या अघटित घटनेने शुक्राचार्य दुःखाने वेडापिसा झाला. आपल्या मृत पुत्राच्या देहाला तो कवटाळून बसला. प्रेत उचलू देईना. तेव्हा तेथे जमलेल्यां पैकी एका वृद्ध ब्राह्मणाने सांगितले,"शुक्राचार्या, तू इतका विद्वान असून वेडा कसा झालास ? बृहस्पती फार चांगला मुलगा होता. तुलाच काय; पण आम्हां सर्वांनाच तो फार प्रिय होता. हे खरे असले तरी मेल्यावर त्याचे शरीर ठेवून काय उपयोग ? मोठ्या-मोठ्या तपस्व्यांना, राजांना, योग्यांना मरण चुकले नाही. मग आपली काय कथा ? तेव्हा शहाणा हो, प्रेतावर अंत्यसंस्कार करणे

आवश्यक आहे." असे म्हणून शुक्राचार्याला बाजूला केले व ते प्रेत विधीपूर्वक स्मशानात नेले.

स्मशानाच्या बाजूला एक तपस्वी राहात होता. तो सामर्थ्यवान असून पाशुपतशास्त्रात प्रवीण होता. स्मशानातील आक्रोश ऐकून तो तपस्वी बाहेर आला. त्याने त्या तरुण ब्राह्मण मुलाचे प्रेत पाहिले. आपण स्वतः त्या देहात प्रवेश करावा असी तीव्र इच्छा त्याला उत्पन्न झाली. लगेच तो आपल्या पर्णकुटीत परत गेला. त्या कुटीत बसून थोडा वेळ रडला व मग आनंदाने नाचला. योगसामर्थ्याने आपला प्राण त्याने आपल्या शरीरातून काढून त्या ब्राह्मणपुत्राचे शरीरात घातला. त्याबरोबर तो मुलगा उठून बसला. सर्वजण आश्चर्यचकित व आनंदित झाले. मुलाच्या शरीरात शिरलेला तपस्वी सर्वांना म्हणाला, "मी कैलास पर्वतावर गेलो होतो. तिथे भगवान शंकर भेटले. त्यांनी मला पाशुपत विद्येसाठी तपश्चर्या करायला सांगितली आहे. त्यांच्याच कृपेने मी जिवंत झालो आहे. भगवान शंकरांची आज्ञा मला मानलीच पाहिजे. आता मी तपश्चर्येला जातो. आपण सर्वांनी घरी जावे." असे म्हणून तो रानात निघून गेला.

तेव्हा दुःखी मनाने सर्व घरी परतले. मुलगा जिवंत झाल्याबद्दलचा आनंद व तो आपल्यापासून दूर गेला, हे दुःख मनात साठवत त्याचे मातापिता दिवस कंठू लागले. तपस्वी आपल्या कार्यात रमला.

वेताळ म्हणाला, "विक्रमा, तो तपस्वी प्रथम रडला व मग आनंदाने नाचला याचे कारण काय?" विक्रमाने उत्तर दिले, "वेताळा, ज्या शरीरात तो इतके दिवस राहिला, योगसिद्धी मिळवली ते शरीर जीर्ण झाले असले तरीही सोडायचे म्हणून वाईट वाटून तो क्षणभर रडला. नंतर तरुण शरीरात प्रवेश करून आपल्याला अधिक ज्ञान मिळवता येणार या आंनदाने तो नाचला." विक्रमाचे उत्तर ऐकल्यानंतर वेताळ त्याचे खांद्यावरून उडाला व जंगलात शिरला.

कथा चोविसावी

# वेताळाचा राजास उपदेश



झाडावर चढून विक्रमाने ते प्रेत खाली आणले व तो चालू लागला. तेव्हा प्रेतातला वेताळ राजाला म्हणाला, "राजा, तू धैर्यवान आहेस. शूर आहेस. दृढनिश्चयी आहेस. हे सर्व खरे असले तरी ह्या परत जाण्याने मी आता त्रासलो आहे, कंटाळलो आहे; पण तुझी चिकाटी जबर आहे. आता मी तुला एकच शेवटची गोष्ट सांगतो ऐक–"

दक्षिणेकडे मायावती नगरीत राजा चंद्रशेखर राज्य करीत होता. त्याच्या पत्नीचे नाव इंद्रायणी. त्याच्या सुखी संसारात नुकतेच एक सुंदर फूल उगवले होते. त्यांना एक गोड मुलगी होती. तिचे नाव होते मधुराणी. मधुराणीने आईचे सौंदर्य व बापाची बुद्धी घेतली असल्याने ती सर्वांची फार फार लाडकी होती. बोबडे बोलणारी मधुराणी हळुहळू मोठी होत होती. सर्व कलांत प्रवीण होत होती. राजा-राणी फार सुखात होती.

आता मधुराणी सोळा वर्षांची झाली होती. राजा तिच्यासाठी अनुरूप वर शोधत होता; पण दैव फिरले होते. सुखाचे दिवस संपले होते. अर्थात् त्याची जाणीव कोणालाच नव्हती; पण एक दिवस मायावती नगरावर परकीयांनी अकस्मात हल्ला चढवला. राजा चंद्रशेखर घाबरून गेला.

त्याने आपल्या पत्नीला व मुलीला जवळ बोलावले व सांगितले, "माझ्या प्राणांनो, या चोरवाटेने तुम्ही नगराच्या बाहेर निघून जा. ही वाट एका दाट जंगलात जाते. आजपर्यंत मी तुम्हांला ही वाट दाखवली नाही. कारण तशी आवश्यकताच वाटली नाही; पण आता या वाटेने जा. परमेश्वर

तुमचे रक्षण करो." असे म्हणून त्याने त्या दोघींना एक चोरवाटेने बाहेर जावयास लावले.

त्या दोघी मायलेकी निघून जाताच त्याने शत्रूवर चढाई केली; पण राजा चंद्रशेखर लढता लढता धारातीर्थी पडला. राजा मरण पावला असे समजताच सैन्याचा धीर सुटला. सैन्य पळत सुटले. शेवटी मायावती नगरी शत्रूच्या ताब्यात गेली.

इंद्रायणी व मधुराणी त्या भुयारातून जंगलात आल्या. दुःखाचा भार सहन करीत करीत त्या चालल्या होत्या. बरेच दूर गेल्यावर त्यांना एक शिवमंदिर दिसले. सभोवताली अजिबात वस्ती नव्हती; पण तरीही त्यांना पुढे पाऊल टाकवत नसल्यामुळे त्या देवळातच थांबल्या. थोड्या वेळात दोघींनाही गाढ झोप लागली.

त्या जंगलाजवळ रहाणारा अर्जुनसिंह नावाचा वीरपुरुष आपला पुत्र विजयसिंहासह त्या रानात शिकारीला आला होता. दैवयोगाने तेही त्या देवळात आले. देवळाबाहेर धुळीत काही नाजूक पावले उमटली होती. ती पाहून अर्जुनसिंह म्हणाला, "मुला, ही पावले दोन सुंदर स्त्रियांची आहेत, हे निश्चित. या पावलांच्या आकारावरून मी सांगतो, की या स्त्रिया सुलक्षणी आहेत. मोठ्या घराण्यातील आहेत. आपल्याला भेटल्या तर त्यातील पाहिजे त्या स्त्रीशी तू विवाह कर! माझी पसंती आहे."

"बाबा यातील ज्या स्त्रीची पावले लहान आहेत, त्या स्त्रीशी मी विवाह करीन. जिची पावले मोठी आहेत, तिच्याशी तुम्ही विवाह करा."

"छे छे, तुझी आई नुकतीच स्वर्गवासी झाली आहे. एवढ्यात मी विवाह करणे बरोबर नाही."

"नाही बाबा, तुम्हांला हा विवाह केलाच पाहिजे. माझी शपथ आहे." विजयसिंह म्हणाला.

"शपथ घालू नकोस! सुटली म्हण. तुझ्याइतके मला काहीच प्रिय नाही. तुझ्या शब्दासाठी मी वाटेल ते करीन." अर्जुनसिंह म्हणाला आणि

ते दोघे देवळात शिरले. देवळात जाऊन पाहातात तो, दोन सुंदर स्त्रिया गाढ झोपलेल्या दिसल्या. यांची चाहूल लागताच त्या जाग्या झाल्या व सावरून बसल्या. त्यांच्याकडे पाहून हे पुरुष लुटारू नसून सभ्य आहेत हे त्यांच्या लक्षात आले.

अर्जुनसिंह म्हणाला, "बायांनो, आता तुम्ही अजिबात घाबरू नका. बाहेर धुळीत तुमची उमटलेली पावले पाहून आम्ही देवळात शिरलो. तुमची इच्छा असेल तर तुम्ही कोण ? कुठल्या ? तुमची अशी अवस्था का झाली ? हे ऐकायची आमची इच्छा आहे ?"

अर्जुनसिंहाच्या बोलण्याने त्या राजस्त्रियांची भीती पुष्कळच कमी झाली. त्यांनी आपली सर्व हकीकत त्यांना सांगितली. त्या दोघांनाही फार वाईट वाटले.

नंतर गप्पा मारता मारता अर्जुनसिंह म्हणाला, "आम्ही दोघांनी बाहेर असतानाच ठरविले होते, लहान पायाच्या स्त्रीशी विजयसिंहाने विवाह करावयाचा आणि मोठ्या पायाच्या स्त्रीशी मी. तुमची इच्छा असेल तर आम्ही विवाहास तयार आहोत."

या दोघींना कुणाचा तरी आधार हवा होता. शिवाय हे दोन पुरुष त्यांना आवडलेही होते, म्हणून त्यांनी होकार दिला. गांधर्व पद्धतीने त्यांचे विवाह साजरे झाले; परंतु ठरल्याप्रमाणे मोठ्या पायाच्या स्त्रीबरोबर अर्जुनसिंहाने लग्न केले आणि त्याच्या मुलाने म्हणजे विजयसिंहाने लहान पायाच्या स्त्रीबरोबर विवाह केला. दैवयोगाने मधुराणीचे पाय आपल्या आईच्या पायापेक्षा मोठे होते. त्यामुळे ती अर्जुनसिंहाची पत्नी झाली व तिची आई विजयसिंहाची पत्नी झाली.

नंतर ते सर्व घरी गेले. कालांतराने इंद्रायणीला व मधुराणीला दोघींनाही मुलगे झाले.

एवढी कथा सांगून वेताळ म्हणाला, "विक्रमा, आता मला सांग. या दोघांना झालेल्या मुलांचे परस्पर नाते कोणते ?"

या प्रश्नावर विक्रमाने खूप विचार केला; पण त्याला उत्तर सापडेना! विचार करता करता तो चालतच होता. तेव्हा वेताळ स्वतःशीच म्हणाला, "माझ्या या अवघड प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी हा वीरपुरुष विचार करतो आहे. स्वतःच्या कष्टाकडे त्याचे लक्षही नाही. याला फसविणे योग्य नव्हे. तो मांत्रिक दुष्ट आहे, पापी आहे. त्याला सिद्धी प्राप्त होता कामा नये तेव्हा त्याला फसवून या राजाचेच कल्याण करायला हवे."

मनात विचार पक्का होताच वेताळ विक्रमाला म्हणाला, "राजा, या किर्र दाट जंगलात, काळोख्या रात्री, स्मशानासारख्या ठिकाणी इतक्या खेपा घालूनही तुझ्या मनात विकल्प आलेला नाही. तुझ्या या कर्तव्य-निष्ठेने मी फार खूष झालो आहे. आता तू प्रेत ने. मी यातून निघून जातो; पण सांगतो ते लक्षात ठेव."

"ज्या मांत्रिकाकरता तू हे प्रेत नेत आहेस तो फार दुष्ट आहे. हे प्रेत घेऊन तू तेथे गेल्यावर तो मला आवाहन करील. मग मी प्रेतात संचार करीन. माझी पूजा करून तो मला तुझा बळी देणार आहे. त्यासाठी तो तुला सांगेल, की 'आठही अंगे टेकवून वेताळाला नमस्कार कर.' तू नमस्कार कर. तू नमस्कार केलास, की तो तुझी मान छाटून टाकील म्हणून असे कर, ज्यावेळी तो तुला सांगेल, 'नमस्कार कर', त्यावेळी तू असे म्हण, की 'नमस्कार कसा करावा ते मला माहीत नाही. तुम्ही दाखवा म्हणजे मी त्याप्रमाणे करीन.' तुला बळी देण्यासाठी तो तांत्रिक अधीर झाला असल्यामुळे तो तुला नमस्कार करून दाखवण्यासाठी जमिनीवर आडवा पडेल. तो जमिनीवर पडला असतानाच तू तलवारीने त्याची मान तोड. नाहीतर तो तुला ठार करील. तुझ्याबद्दल मला आत्मीयता वाटत असल्यामुळे मी तुला इतक्या वेळा विघ्न आणत होतो, तुझी परीक्षा पाहात होतो. आता असाच मांत्रिकाकडे जा; परंतु सांगितलेले सर्व लक्षात ठेव." एवढे बोलून वेताळ स्मशानातील झाडाकडे निघून गेला.

## कथा पंचविसावी

# वेताळ प्रसन्न झाला!



झाडावर लोंबकळणारे प्रेत विक्रम राजाने पुन्हा खांद्यावर घेतले व त्या अघोरी मांत्रिकाकडे जाऊ लागला. अघोरी मांत्रिक वेताळपूजेची जय्यत तयारी करून विक्रम राजाची वाटच पाहात होता. विक्रमराजा प्रेत घेऊन आलेला पाहून त्या मांत्रिकाला अतिशय आनंद झाला. त्याने राजाला ते प्रेत पेटत्या धूनीशेजारी ठेवायला सांगून त्या प्रेताभोवती स्मशानभस्माची रांगोळी काढली. माणसाच्या कवटीची पणती पेटवली व त्या प्रेताची अघोरी विधिपूर्वक पूजा केली. नंतर प्रेतासमोर पद्मासन घालून बसला. आता तो मांत्रिक एकाग्र चित्ताने वेताळाचे आवाहन करत होता. आवाहन पूर्ण होताच त्या प्रेताने आपले भयंकर अग्नीसारखे डोळे उघडले अन् भयानक हास्याचा गडगडाट केला! वेताळ प्रेतात प्रगट झाला होता, तेथील तो भयानक पूजाविधी आणि महाभयानक वेताळ रूप पाहून कोणीही शूर माणूससुद्धा भीतीने बेशुद्ध झाला असता; परंतु धैर्यमेरू विक्रम हा प्रकार अतिगंभीरपणे पाहात होता.

मांत्रिक म्हणाला, "राजा, आता तू वेताळाला मनोभावे साष्टांग नमस्कार कर. तुझे कल्याण होईल."

विक्रमाला झटक्यात वेताळाचे बोल आठवले. 'राजा, तू नमस्कार घालू नको!' राजाने परिश्रमाने चेहऱ्यावर हास्य आणून म्हटले, "महाराज, माझे सर्व आयुष्य राजघराण्यातील असल्याने साष्टांग नमस्कार कसा करतात ते मला माहीतच नाही तर करू कसा? आपणच स्वतः करून दाखवा. मला नीट शिकवा म्हणजे मला तसे करता येईल. अघोरी मांत्रिक सिद्धी



विक्रमराजाने तलवारीचा वार करून झटक्यात मांत्रिकाचे शिर उडविले.

मिळविण्यासाठी अधीर झाला होता. त्याने ' बरं. ' असे म्हणून तो साष्टांग नमस्कार घालून दाखवू लागला. त्या मांत्रिकाचे डोके जमिनीवर टेकताच विक्रमराजाने सफाईदार तलवारीचा वार करून झटक्यात मांत्रिकाचे शिर उडविले. मांत्रिकाला समजलेही नाही आपण केव्हा कसे मेलो ते !

मांत्रिक मरताच तेथील अघोरी पूजा व अग्नीकुंड प्रेतासह अदृश्य झाले अन् वेताळ मंगल रूपात मूर्तिमंत प्रगट झाला आणि म्हणाला, " राजा, मी प्रसन्न झालो आहे वर माग. "

राजाने त्याला मनोभावे नमस्कार केला आणि म्हणाला, " वेताळा, मला तुझे नेहमी साहाय्य मिळो, आणि या तू सांगितलेल्या गोष्टी भूतलावर ' वेताळ पंचविशी ' म्हणून अमर व्हाव्यात आणि जो भक्तिभावे या गोष्टी वाचेल अगर ऐकेल, तो जगात निर्भय व सुखी होवो. "

" तथास्तु ! शुभं भवतु ! " असे म्हणून वेताळ अदृश्य झाला.

राजा राजवाड्यात आल्यावर सर्व घटना सांगितल्यावर सर्व प्रजेने आनंदाने उत्सव केला. विक्रमराजाने पुढे दीर्घ काळ सुख समृद्धीत राज्यकारभार केला.

समाप्त